रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

♦ वर्ष १७ ♦ अंक १८३
www.ramprahar.com
शनिवार, १८ जानेवारी २०२५ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹२

## अंतरंग

बोरघाटात बस जळून खाक; प्रवासी बचावले/२
कर्जत परिसरात आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह/५
विजय हजारे चषक स्पर्धेची आज अंतिम लढत/८

## अभिनेता सैफ अली खान हल्लाप्रकरणी सर्व बाजूंनी तपास



**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेल्या चाकूहल्ला प्रकरणात अज्ञात व्यक्तीविरोधात मुंबईच्या वांद्रे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सैफ अली खानच्या घराची इमारत आणि परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. चोरी करण्याच्या प्रयत्नातून ही घटना घडल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना माहिती दिली की, पोलिसांचा तपास हा योग्य पद्धतीने सुरू आहे. त्यांच्यावर अनेक पुरावे आहेत. या संपूर्ण प्रकरणावर पोलीस लक्ष ठेवून आहेत तसेच आवश्यक त्या सर्व बाबींनी तपास सुरू आहे. लवकरच पोलीस या प्रकरणात अंतिम निकालावर जाणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# उलवे नोडमध्ये 23 ते 25 जानेवारीदरम्यान
# नमो चषक 2025 भव्य क्रीडा महोत्सव

## पाच हजारपेक्षा जास्त खेळाडू, लाखो क्रीडारसिकांचा लाभणार सहभाग -लोकनेते रामशेठ ठाकूर

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने २३, २४ व २५ जानेवारीला भव्य क्रीडा महोत्सव अर्थात नमो चषक २०२५चे आयोजन उलवे नोड सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या पाठीमागील बाजूच्या मैदानावर करण्यात आले असल्याची माहिती माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १७) येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




या पत्रकार परिषदेला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे माहिती देताना सांगितले की, मागील वर्षी महाराष्ट्रात झालेल्या नमो चषक स्पर्धेत संपूर्ण राज्यातून पनवेलने चौथा क्रमांक पटकावला होता. त्या अनुषंगाने उत्कृष्ट आयोजन व नियोजनाचा फायदा या नमो चषक स्पर्धेला होणार आहे. या क्रीडा महोत्सवात राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा, खो-खो, कबड्डी तसेच धावणे, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडाफेक या अॅथलेटीक्स स्पर्धा होणार आहेत. शरीरसौष्ठव स्पर्धा फक्त पुरुष गटात व वजनी प्रकारात होणार आहेत, तर कबड्डी, खो-खो व अॅथलेटीक्स स्पर्धा पुरुष व महिला गटात होतील. त्यामध्ये कबड्डी वजनी प्रकारात, तर खो-खो व अॅथलेटीक्स स्पर्धा वयोगटानुसार होणार आहेत. या नमो चषकात पाच हजारपेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग असणार असून स्पर्धेचा लाखो क्रीडाप्रेमी लाभ घेतील, असा विश्वासही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

स्पर्धेतील राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेतील एकूण विजेत्यांना सात लाख ५६ हजार रुपये, खो-खोमधील एकूण विजेत्यांना एक लाख ४३,२०० रुपये, कबड्डी स्पर्धेतील मधील एकूण विजेत्यांना एक लाख ८१ हजार रुपये, तर अॅथलेटीक्स स्पर्धेतील एकूण विजेत्यांना चार लाख ११ हजार रुपये अशी एकूण तब्बल १४ लाख ९१ हजार २०० रुपयांची रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

विजेत्या खेळाडूंना भरघोस रकमेची बक्षिसे आणि प्रवेश विनामूल्य हे या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. खेळ आणि खेळाडूंच्या अनुषंगाने परिपूर्ण काळजी घेण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन करण्यात येत आहे. हा क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विविध प्रकारच्या १७ समित्या गठीत करण्यात आल्या असून प्रत्येक समिती आपापली जबाबदारी पार पाडत आहेत. नमो चषक स्पर्धेचा जास्तीत जास्त खेळाडू व क्रीडारसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी सांगितले की, मागील वर्षी नमो चषक स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पनवेल विधानसभा मतदारसंघात २१ क्रीडा प्रकारात झालेल्या या स्पर्धेत एक लाख १३ हजार २७८ स्पर्धकांनी सहभाग घेऊन पनवेलने महाराष्ट्रात चौथा क्रमांक पटकाविला होता. त्याच अनुषंगाने यंदाही नमो चषक भव्य दिव्य स्वरूपात करण्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केले. त्यानुसार स्पर्धास्थळी जोरदार तयारी करण्यात आली असून सर्व तयारी अंतिम टप्प्यात आहे.

नमो चषक स्पर्धेचे उद्घाटन २३ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, विधान परिषद आमदार विक्रांत पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, नमो चषकाचे मुख्य आयोजक व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, उलवे नोड अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे २ अध्यक्ष विजय घरत तसेच स्थानिक स्वराज्य संस्था लोकप्रतिनिधी व अन्य मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

विनोद नाईक यांनी, राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा २३ जानेवारीला, कबड्डी २४, तर खो-खो २५ जानेवारीला आणि या तिन्ही स्पर्धा प्रकाशझोतात होणार असल्याचे सांगून धावणे, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, कीड व्हेलीन थ्रो, हातोडाफेक या अॅथलेटीक्स स्पर्धा तीनही दिवशी दिवसा होणार असल्याचे सांगितले.

## वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये मुख्यमंत्री फडणवीस होणार सहभागी

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० ते २४ जानेवारी या काळात दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी होणार आहेत. यासाठी १९ तारखेला पहाटे ते मुंबईतून रवाना होतील. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक आणण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस हे त्यांच्या पहिल्या कार्यकाळात तीन वेळा दावोसमध्ये वर्ल्ड इनॉकॉनिक फोरममध्ये सहभागी झाले होते. त्या वेळी औद्योगिक विकासात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आला होता. राज्यात २०१४-१९ काळात मॅग्नेटिक महाराष्ट्राचे दोन वेळा आयोजन झाले. आताही या दौऱ्यात मुख्यमंत्री फडणवीसांचे भरगच्च कार्यक्रम दावोस दौऱ्यात राहणार आहेत. अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत. या दौऱ्यात उद्योगमंत्री उदय सामंत तसेच एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ त्यांच्यासोबत असेल.

डेटा सेंटर्स, ऑटोमोबाईल्स, सेमीकंडक्टर, ईव्ही, इलेक्ट्रॉनिक्स, स्टील, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधी आणि पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रात मोठ्या संख्येने सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत. महाराष्ट्राची एक

### राज्यात परकीय गुंतवणुकीसाठी देणार भर

ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक राज्यात आणण्याचा प्रयत्न या दौऱ्यातून साध्य करण्याचा प्रयत्न होईल आणि यातून रोजगारनिर्मितीचेही उद्दिष्ट साध्य केले जाणार आहे. महाराष्ट्राने विविध प्रकारची धोरणे अलिकडेच जाहीर केली आहेत, त्याबाबतसुद्धा ते विविध व्यावसायिक बैठकांमध्ये अवगत करतील. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा मुख्यमंत्री फडणवीस दावोस दौऱ्यातून प्रयत्न करणार आहेत.

**समतोल विकासावर भर**

राज्यात गुंतवणूक आणताना किंवा पायाभूत सुविधांचा विकास करताना आम्ही सातत्याने चौफेर विकास कसा होईल आणि प्रादेशिक समतोल कसा राखला जाईल यावर भर दिला. या दावोस दौऱ्यातसुद्धा महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात आणि विभागात गुंतवणूक कशी येईल, यादृष्टीने आमचे प्रयत्न असतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**'महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारणार'** /पान २ वर..

## निवडक

### तामिळनाडूत जलीकट्टूदरम्यान एकाच दिवशी सात जणांचा मृत्यू

**चेन्नई :** पोंगल सणानिमित्त तामिळनाडूमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित जलीकट्टू खेळाच्या स्पर्धेदरम्यान गुरुवारी (दि. १६) एकाच दिवसात सात जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ४००हून अधिक जण जखमीही झाले असल्याचे तामिळनाडू पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांपैकी सहा जण प्रेक्षक, तर एक मृत व्यक्ती जलीकट्टूमध्ये सहभागी झाला होता. याशिवाय दोन बैलांचाही मृत्यू झाला आहे.

### मनू भाकर, गुकेशसह स्वप्नील राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराने सन्मानित

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १७) डबल ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी. गुकेश, दोन वेळेचा ऑलिम्पिक पदक विजेता पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग, पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता उंच उडीपटू प्रवीण कुमार यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन, तर दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. (पान ८ वर..)

केटीएसपी मंडळ स्टॅम्प पेपर खाडाखोड प्रकरण

## खोपोली पोलिसात गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक (केटीएसपी) मंडळाचा विद्यार्थी भांडार विभाग भाडेतत्त्वावर घेण्याच्या करारासाठी कार्यवाह किशोर बाळकृष्ण पाटील यांनी वापरलेल्या स्टॅम्प पेपरवरील तारखेत खाडाखोड आढळून आली आहे. या प्रकरणी जागृत नागरिक तथा संस्थेचे कार्यकारिणी सदस्य यशवंत साबळे यांनी खोपोली पोलिसात दिलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर संबंधितांचे जाब जबाब घेऊन गुरुवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला.

केटीएसपी मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांनी विद्यार्थी ग्राहक भांडार चालवण्यासाठी जागेच्या करारासाठी कोषागरातून डी एन २३५७३१ क्रमांकाचा मुद्रांक १२ ऑक्टोबर २००८ रोजी खरेदी केला होता. या मुद्रांकावर भांडार विभाग चालवण्यासाठी कराराची मुदत १५ जून २००८ ते १४ जून २०१३ अशी नमूद करण्यात आली. त्यात एक ते नऊ अटी व शर्ती नमूद करण्यात आल्या होत्या, मात्र मुद्रांकमध्ये खाडाखोड केल्याचे संस्थेचे सदस्य यशवंत साबळे यांना

> खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ ही सार्वजनिक संस्था असल्याने कारभार पारदर्शक असावा असा माझा नियमित प्रयत्न होता. ज्या ज्या नागरिकांनी तसेच प्रसारमाध्यमांनी मला चांगल्या कामासाठी पाठिंबा दिला त्या सर्वांचे मी ऋणी राहीन.
> **-यशवंत साबळे,** कार्यकारिणी सदस्य, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

निदर्शनास आल्यानंतर त्यांनी ही बाब संस्थाचालकांच्या निदर्शनास आणून दिली, पण योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने साबळे यांनी पोलिसात धाव घेतली.

खोपोली पोलिसांनी संबंधितांचे जाबजबाब घेतल्यानंतर मुद्रांक पेपरमध्ये खाडाखोड केल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी गुरुवारी उशिरा पोलिसांनी भां.द.वि. ३१८(४), ३३८, ३३६(३) व ३४० (२) अन्वये किशोर पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत अधिक तपास करीत आहेत.



## खालापुरातील शिवसेना उबाठा पदाधिकारी भाजपमध्ये

### प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून स्वागत

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघामधील आणि खालापूर तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशकर्त्यांचे भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी पक्षात स्वागत केले.

मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

भाजप हा आधी राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः या विचारधारेतून देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या देशभक्त कार्यकर्त्यांचा एकमेव पक्ष आहे. त्यामुळेच सामाजिक कार्याची तळमळ असणारे अनेक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने भाजप परिवारात प्रवेश करत आहेत. त्यानुसार खालापुरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोतीराम ठोंबरे, वावर्ले ग्रामपंचायतीतील माजी सरपंच राजू मोरे यांच्यासह वावर्ले, धारणी, जांभिवली, आसरे, मोरबे, भिलवले, चौक, हातनोली, वरोसे, आसरोटी, कोपरी, कलोते या गावांतील कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

## सिडकोच्या बेलापूर-पेंधर मेट्रो मार्गावर येत्या सोमवापासून सुधारित वेळापत्रक

### सर्वाधिक गर्दीच्या वेळांमध्ये दर १० मिनिटांनी धावणार मेट्रो



**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या बेलापूर ते पेंधर या मेट्रो मार्ग क्र. १वर २० जानेवारीपासून मेट्रोच्या फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक लागू होणार असून सकाळी आणि सायंकाळी सर्वाधिक गर्दीच्या वेळी दर १० मिनिटांनी मेट्रो धावणार आहे. मेट्रोच्या फेऱ्यांमध्ये वाढ झाल्याने गर्दीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा लाभ होणार आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर विकसित करण्यात आला आहे. या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रोसेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. सीबीडी बेलापूर परिसर, तळोजा औद्योगिक क्षेत्र आणि सिडकोच्या गृहसंकुलांना या मेट्रोमार्गाद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे.

सर्वाधिक गर्दीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाढीव मेट्रो फेऱ्यांचा लाभ व्हावा याकरिता या मार्गावर २० जानेवारीपासून मेट्रो फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. त्यानुसार बेलापूर आणि पेंधर स्थानकांतून सकाळी ६ वाजेपासून मेट्रोसेवा सुरू होणार आहे. बेलापूर येथून रात्री १० वाजता व पेंधर येथून रात्री ९.४५ वाजता मेट्रोची शेवटची फेरी धावणार आहे. सर्वाधिक गर्दीच्या वेळेत बेलापूर येथून सकाळी ७.३० ते १० आणि सायंकाळी ५.३० ते ८, तर पेंधर येथून सकाळी ७ ते ९.३० आणि सायंकाळी ५ ते ७.३० दरम्यान दर १० मिनिटांनी मेट्रोची फेरी होणार आहे. सर्वाधिक गर्दीच्या वेळा वगळता उर्वरित वेळांमध्ये बेलापूर व पेंधर येथून दर १५ मिनिटांनी मेट्रो धावणार आहे.

## भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गावर नारायणगावजवळ शुक्रवारी (दि. १७) सकाळी पावणेदहाच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला. आयशर टेम्पोने एका व्हॅनला पाठीमागून धडक दिल्याने हा अपघात झाला. धडक बसल्यानंतर ही व्हॅन पुढे थांबलेल्या एका बसवर आदळली. त्यामुळे आणखी हानी झाली.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अपघातील मृतांना श्रद्धांजली अर्पण केली असून वारसांना पाच लाख रुपयांच्या आर्थिक सहाय्याची घोषणा केली आहे. त्याचप्रमाणे जखमींच्या उपचाराची योग्य काळजी घ्या, असे निर्देश त्यांनी दिले आहेत.



# ‘शासकीय योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावा आणि उद्दिष्टपूर्ती करा’

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील सर्व बँकांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत दिलेले उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करावे. योजनेतील नामंजूर झालेल्या अर्जांची परत एकदा अवलोकन करून जास्तीत जास्त प्रस्ताव मंजूर करावेत. यासाठी बँकानी आणि जिल्हा उद्योग केंद्र यांनी समन्वयाने शिबिर आयोजित करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.




जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार व आढावा समितीची बैठक राजस्व सभागृहात झाली. या बैठकीला भारतीय रिझर्व बँकच्या वित्तीय समावेशन आणि विकास विभागाचे व्यवस्थापक विशाल गोंडखे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक विजय कुलकर्णी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी एस हर्लय्या, जिल्हा विकास यंत्रणाचे संचालक प्रियदर्शनी मोरे, माविमचे जिल्हा व्यवस्थापक विजय डोके, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, दौलकर, आरसेटीचे संचालक सुमित धानोरकर तसेच विविध विभाग व महामंडळाचे अधिकारी, बँकांचे जिल्हा समन्वयक, प्रतिनिधी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्याला सप्टेंबरअखेर पर्यंत प्राथमिकता क्षेत्रासाठी पाच हजार २७५ कोटींच्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याचे उद्दिष्ट असताना बँकानी पाच हजार ६८२ कोटी (१०९%) कर्ज वाटप झाले आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्व बँकाचे अभिनंदन करून किसान क्रेडिट कार्डसाठी असणारे ४५० रुपये कोटी उद्दिष्ट १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करा. मत्स्य व्यवसाय आणि दुग्ध व्यवसाय अंतर्गत किसान क्रेडिट कार्ड देण्याला प्राधान्य द्या. बँकांनी व शासकीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून नागरिकांना नियमित आणि चांगल्या पद्धतीने सेवा द्या तसेच शासकीय योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

अन्य शासकीय योजनांतर्गत बँकांकडे प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत. तसेच सर्व शासकीय योजनांच्या कर्ज प्रकरणांची मार्च अखेर उद्दिष्ट पूर्तता करावी. शासनाच्या आणि महामंडळांच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना मिळवून द्यावा. यासाठी बँकांनी वार्षिक पतपुरवठा आराखड्याबरोबरच शासकीय व महामंडळांच्या योजनांची उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे तसेच कृषी व तत्सम क्षेत्र, लघु उद्योग क्षेत्र, प्राथमिक क्षेत्राची उद्दिष्टपूर्ती करावी. प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया योजनांमध्ये लाभार्थ्यांना भरघोस लाभ देण्यात येतो. त्या अंतर्गत जास्तीत जास्त प्रकरणे होण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घ्यावा.

बँकानी ग्राहकांना बँकिग सुविधा पूर्वण्याबरोबरच त्यांना आर्थिक दृष्ट्या साक्षर कण्यासाठी पुढाकर घ्यावा. यासाठी कर्ज मेळाव्याबरोबरच आर्थिक साक्षरतेचे नियोजन करावे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून जिल्ह्यात क्रीसिल आणि स्वाधार फाउंडेशन मदतीने ज्या लोकांची बँक खाती नाहीत आणि ज्यांनी सुरक्षा बिमा योजेनेचा फायदा घेतला नाही त्या सर्वांनी बँक खाती उघडावित आणि योजनेचा फायदा घ्यावा. जास्त व्याज घेणाऱ्या संस्थांमधून कर्ज न घेता सरकारी बँकामधुन घ्यावे तसेच बनावट नोटा ओळखणे व नाण्यांच्या वापरा संबंधी जिल्ह्यात जनजागृती करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन या वेळी जावळे यांनी केले.

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांच्या योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, बचत गटांना पतपुरवठा, पीएम स्वनिधी, स्टॅन्ड अप इंडिया, विश्वकर्मा योजना, कृषी पायाभूत विकास निधी आदी विषयांचा आढावाही जावळे यांनी घेतला.

### सप्टेंबर २४पर्यंत साध्य उद्दिष्ट

कृषी क्षेत्रासाठी १ हजार ९५ कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना बँकानी १हजार ५८ कोटी (९७ %)तसेच सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगासाठी रू. ३३०४ कोटी रुपये उद्दीष्ट असताना रू. ३५५२ (१०८%)तर पीक कर्जासाठी ४५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट जिल्ह्याला देण्यात आले असताना बँकानी रु.३५८ कोटी (७९%) साध्य केले असुन मुद्रा अन्तर्गत जिल्ह्यामध्ये रु ३३४ कोटी कर्ज वाटप करण्यात आले असल्याचे जिल्हा अग्रणी बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी माहिती दिली.

# खासगी ट्रॅव्हल्सची बस बोरघाटात जळून खाक

## ३० प्रवासी बालंबाल बचावले



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील दत्त मंदिर जवळ वाहतूक पोलीस मदत केंद्राच्या हाकेच्या अंतरावर सुविधा ट्रॅव्हल्स मिनी बसला इंजिन मध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. आगीमध्ये बस पूर्णपणे जळून खाक झाली.बसमधील सर्व ३० प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

सुविधा ट्रॅव्हल्स मिनी बस चालक आसिफ बशीर केनिया रा. दहिसर मुंबई हा ३० प्रवासी घेऊन मिरा रोड येथून लोणावळा येथे द्रुतगती मार्गाने जात असताना गाडीचे समोरील इंजिन भागात शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. बसला लागलेल्या आगीची माहिती मिळताच खोपोली नगरपालिका अग्निशमन दलाचे जवान मोहन मोरे व पथक, IRB कडील फायर ब्रिगेड व २ देवदूत टीम यांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न केले परंतु तोपर्यंत मिनी बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती.

बोरघाट मदत केंद्राचे पोलिस उपनिरीक्षक गजानन म्हात्रे अनिल शिंदे, संतोष खाडे व स्टाफ यांनी लोणावळा पर्यटनासाठी आलेल्या प्रवाशांना इतर वाहनांतून लोणावळा येथे रवाना केले. या घटनेत वाहतूक एक तास ठप्प झाली होती.

# नेरळमध्ये चौथ्या मजल्यावरून उडी मारून तरुणाची आत्महत्या

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील एका २३ वर्षीय तरुणाने इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेत जीवन संपवल्याची घटना समोर आली आहे.स्वप्निल सुरेश सावंत असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव असून तो मूळचा सुधागड पाली येथील राहणारा आहे.

शुक्रवार (दि.१६) रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास स्वप्निल कामावरून घरी आला होता.नेहमी प्रमाणे आपल्या रोजच्या सहकाऱ्यांना आवाज देत स्वप्निल घरी गेला आणि रात्री साडे दहा वाजता त्यांनी राहत्या इमारतीच्या टेरेस वरून उडी घेतली.

भिवपुरी रेल्वे स्टेशन जवळ असणाऱ्या डिक्सल परिसरातील डायमंड या सोसायटीत स्वप्निल सुरेश सावंत हा आपल्या आई आणि आजी सोबत गेली सहा महिन्यापासून रहायला आला होता.वडिलांचे छत्र डोक्यावरून हरपल्यानंतर तो कर्जत येथे आपल्या मामाकडे आला. त्यानंतर त्याने डायमंड वसाहतीत भाडे तत्त्वावर राहण्यास सुरुवात केली.भाऊ बहीण नसल्याने आई आणि आजीची सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर होती.शुक्रवार रात्री तो नेहमी प्रमाणे घरी आला आणि रोजच्या सवयीनुसार त्याने सर्वांना हात करून घरी देखील गेला होता.दरम्यान रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास येथील रहिवाशी मनसेचे अक्षय महाले यांना कसला तरी पडण्याचा आवाज आला असता.

स्वप्निल इमारतीच्या टेरेस वरून पडुन जखमी अवस्थेत होता,तो जिवंत असल्याने त्यांनी ताबडतोब उचलून जवळील रायगड हॉस्पिटल मध्ये नेले परंतु हॉस्पिटलच्या दारातच स्वप्निलने अखेरचा श्वास घेतला.घटनास्थळी नेरळ पोलीस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे दाखल झाले

घरात एकुलता एक मुलगा कमवता असल्याने आज आईचा आधार हरपला होता.तर नेहमी हसत खेळत सर्वांना आवाज देणारा स्वप्निल यामुळे डायमंड वसाहती परिसरात शांतता पसरली होती.स्वप्निलने आत्महत्या का केली याबाबत अद्याप माहिती मिळू शकलेली नाही याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# माजी आमदार देवेंद्र साटम यांच्यावर वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छांचा वर्षाव

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर कर्जतचे माजी आमदार व भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते देवेंद्र साटम यांना ७० वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या हितचिंतकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. आमदार प्रशांत ठाकूर हेही आवर्जून उपस्थित होते.

खालापूर कर्जतचे माजी आमदार व भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते देवेंद्र साटम यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला,यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी शुभेच्छा दिल्या.सकाळ पासून सर्व पक्षीय कार्यकर्त्यांची रिघ लागली होती. सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातून शुभेच्छा संदेश देण्यात आला.

भारतीय जनता पक्षाचे राज्य प्रभारी रविंद्र चव्हाण, लोकनेते व माजी खासदार रामशेठ ठाकूर,आमदार महेश बालदि यांनी भ्रमणध्वनी वरुन शुभेच्छा देऊन दीर्घायुषी चिंतीले.आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती सर्वांना आपलासा वाटणारा नेता म्हणुन झाली.

आमदार प्रशांत ठाकूर,माजी आमदार सुरेश लाड, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती नितीन देशमुख,उत्तर रायगड महीला अध्यक्षा अश्विनीताई पाटील,शिवसेना महिला जिल्हाप्रमुख रेखा ठाकरे, माजी सभापती नरेश पाटील,माजी सभापती रामदास ठोंबरे, माजी उपसभापती निवृत्ती पिंगळे,माजी उपसभापती श्याम साळवी, भारतीय जनता पक्षाचे खालापूर प्रभारी सनी यादव, प्रदिप गोंधळी, भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, अँड. राजेंद्र येरुंकर,प्रभाकर चोगले,किरण बांगर, चौक शहर भाजप अध्यक्ष गणेश कदम, माजी सरपंच अनिल जाधव,अंकुश मोरे,रवी मोरे, ज्येष्ठ नेते शंकर हजारे, शांताराम हजारे यांच्यासह शेकडो सर्व पक्षीय कार्यकर्ते यांनी हजर राहून शुभेच्छा दिल्या.





# भौगोलिक छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा, नकाशा पुस्तक यांचे प्रदर्शन

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात १४ जानेवारी या भूगोल दिनानिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा या निमित्त विविध प्रकारचे नकाशे, नकाशा पुस्तक (टलास) तसेच भौगोलिक छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा, प्रकल्प अहवाल यांचे प्रदर्शन दिनांक १४ आणि १५ जानेवारी रोजी संपन्न झाले.

महाविद्यालयातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. फक्त मार्क किंवा अभ्यास या पलीकडे मानवी जीवनातील प्रत्येक टप्प्यावर नकाशांचे महत्त्व कसे आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. नैसर्गिक आपत्ती, देशाचे संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे नियोजन, व्यवस्थापन, समस्यांचे निराकरण करण्यासाठी नकाशांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. अरूण पाटील यांनी विद्यार्थ्यांना विस्ताराने व उदाहरणांसह पटवून दिले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. धारप, ग्रंथपाल गोपाल जोशी आणि ग्रंथालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

पान १ वरुन

## महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारणार –लोकनेते रामशेठ ठाकूर

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना उलवे नोडमध्ये उभारण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टीबद्दल पत्रकारांना अवगत केले. मुंबईतील शिवाजी पार्क मैदानाप्रमाणे आणि महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारली जाईल, असे त्यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर माहिती देताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळानजीक उलवे नोड हा भाग सिडको विकसित करीत आहे. अटल सेतूमुळे मुंबईच्या अगदी जवळ आल्याने या भागाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या भागात उद्योग, राजकीय आणि सामाजिक संघटनांनी विशेष लक्ष दिले आहे. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याची संकल्पना गव्हाण आणि उलवे विभागातील नागरिकांनी मांडली आहे. या स्मारकासाठी सिडकोकडे जमीन मागितली होती. ती जमीन देण्यास सिडको तयार झाली आहे. गव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत मुंबईच्या शिवाजी पार्कसारखे एक मैदान उलवे नोडमध्ये माझ्या म्हणजेच रामशेठ ठाकूर यांच्या नावाने निर्माण व्हावे असा प्रस्ताव काँग्रेस नेते महेंद्र घरत यांनी मांडला आणि त्याला काही ग्रामस्थांनी अनुमोदन दिले होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी सिडकोने जमीन देण्याचे कबूल केले आहे. या जमिनीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारुढ पुतळा उभारण्यासाठी जेवढा खर्च येईल तो श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ करण्यास तयार आहे. यासाठी २५ ते ३० कोटी रुपये खर्च करण्याची तयारीही मी दर्शवली आहे.

मुंबईतील शिवाजी पार्कच्या धर्तीवर या ठिकाणी मुलांना खेळण्यासाठी तसेच संमेलने, राजकीय सभा, सांस्कृतिक महोत्सव व अन्य कार्यक्रमांसाठी उभारण्यात येणारे हे भव्य मैदान नागरिकांना फायदेशीर ठरणार आहे. अश्वारूढ पुतळ्यासाठी साधारण एक एकर जमीन सिडकोने राखीव ठेवली आहे, तर मैदानासाठी पाच एकरचा भूखंड राखीव ठेवण्यात आला आहे. सामाजिक कार्यासाठी संस्था संघटनांना नाममात्र शुल्कात भूखंड सिडकोकडून दिले जाते. त्याच धर्तीवर ही जमीन सामाजिक कार्यासाठी नाममात्र दरात मिळावी. खरेतर प्रकल्पग्रस्त उभारत असलेल्या प्रकल्पाला सिडकोने जमीन मोफत द्यायला हवी. शेतकऱ्यांकडून १५ हजार रुपये एकरी या भावाने सिडकोने त्या वेळी जमीन खरेदी केली आहे, मात्र आता त्याच एकरसाठी जवळपास पाच कोटींच्या वर रक्कम भरण्यास सिडकोकडून सांगण्यात येत आहे. या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असून ते यामध्ये लक्ष घालतील आणि या ठिकाणी शिवाजी पार्कप्रमाणे आणि महाराष्ट्राला अभिमान वाटेल असा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आणि शिवसृष्टी उभारली जाईल. यासाठी मी खर्च करणार असलो तरी यावर सर्वांचा हक्क राहील, पण या सर्व वास्तूंचा ताबा अधिकार गव्हाण ग्रामपंचायतीकडे राहील, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी अधोरेखित केले.

## सीकेटी कॉलेजमध्ये राष्ट्रीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज नवीन पनवेल (स्वायत्त) येथे डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने PM-USHA स्कीम फॉर स्ट्रेंथन युनिव्हर्सिटीज (GSU) अंतर्गत २० ते २५ जानेवारीदरम्यान राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रम अंतर्गत सहयोगी शैक्षणिकांसाठी सामग्री निर्मिती, क्युरेशन आणि संकलन या विषयी माहिती देण्यात येणार आहे. या वेळी प्रमुख अतिथी कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे डॉ. रजनीश के. कामत, व्हिक्टोरियल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ऑस्ट्रेलियाचे उपाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, कलाशाखेचे प्रमुख डॉ.बी.एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ.एस.बी. यादव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे.एस. ठाकूर, आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ.बी.डी. आघाव, विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा.जी.एस. साठे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. साठे, रुसा समन्वयक डॉ. एस.एन. वाजेकर व विज्ञान संघटनेचे सर्व सदस्य अथक परिश्रम घेत आहेत.


प्रस्तुत कार्यक्रमासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कळंबोलीतील रस्ते व गटाराची कामे पूर्ण करा

## शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहत ही समुद्र सपाटीपासून तिन मिटर खोल असल्याने पाणी साचून रस्त्याची दुरावस्था होत आहे. त्या पार्श्वभूमीवर कामोठा,कळंबोली, खारघर व नवीन पनवेल येथील मुख्य रस्त्यांचे काँक्रिटीकरण व गटराची कामे सुरू आहेत.त्या अनुषंगाने ही कामे लवकरात लवकर पूर्ण करून वसाहती मधील नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी दि.१६ रोजी आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली.



पालिकाक्षेत्रातील वसाहतीमध्ये मोठ्याप्रमाणात रस्त्यांची दुरावस्था झाली होती. तसेच कळंबोली कॉलनी समुद्रसपाटीपासून साडेतीन मीटर खाली असल्याने. कमी पावसातही वसाहत जलमय होते. त्यामुळे रस्त्यांची दुरावस्था होते. वसाहत अंतर्गत रोडची एक प्रकारे चाळण झाली होती. कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून रस्त्यांचे काँक्रिटीकरण व गटराची कामे जवळपास एक वर्षांपासून सुरू आहेत. मध्यंतरी पावसाळ्यात या कामांमध्ये खंड पडला होता. परंतु या कामामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात समस्यांचा सामना करावा लागत आहे.

ही प्रस्तावित कामे लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा मिळावा या साठी आयुक्तांना निवेदन देण्यात आले. याबाबत त्वरित कार्यवाही करण्याची ग्वाही आयुक्तानी शिवसेनेच्या शिष्टमंडळाला दिली. या वेळी शिवाजी थोरवे, सुनिल गोवारी, सुभाष घाडगे अदी उपस्थित होते.

# इर्शाळवाडीच्या शालेय विद्यार्थ्यांना सायकली भेट

**पनवेल : वार्ताहर**

विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे मोठ्या दुर्घटनेतून सावरलेल्या इर्शाळवाडी येथील शालेय विद्यार्थ्यांना १० अत्याधुनिक सायकली भेट स्वरुपात देण्यात आल्या.

प्रांतपाल रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१ डॉ.गिरीश गुणे यांच्या मार्गदर्शनाखाली इर्शाळवाडी येथे जावून ज्या गरजवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज पायपीट करून शाळेत जावे लागते व पुन्हा घरी परतावे लागते अशा विद्यार्थ्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून अत्याधुनिक अशा १० सायकली भेट देण्यात आल्या. उपस्थित विद्यार्थ्यांनी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे आभार मानले.

या वेळी रोटरीचे प्रेसिडंट शैलेश पोटे, सेक्रेटरी दीपक गडगे, ट्रेझरर ऋषिकेश बुवा व सर्व्हीस प्रोजेक्ट डायरेक्टर सुदीप गायकवाड यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.



### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आक्रमक पवित्रा

# गव्हाण येथे तोडक कारवाईसाठी आलेले सिडकोचे पथक माघारी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण गावात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी बांधलेल्या बांधकामांवर शुक्रवारी (दि. १७) सिडकोचा अतिक्रमण विभाग पोलीस फौजफाट्यासह कारवाई करण्यासाठी आला असता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतलेल्या तीव्र आंदोलनाच्या भूमिकेमुळे सिडकोच्या पथकाला नरमाईची पत्करत माघारी फिरावे लागले.

उलवे नोड परिसरातील गव्हाण गावात प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी बांधलेल्या बांधकामांवर शुक्रवारी सिडकोचा अतिक्रमण विभाग पोलीस फौजफाटयासह कारवाई करण्यासाठी आल्याची माहिती प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना मिळताच त्यांनी आपली स्वत:ची कामे बाजूला ठेवून ते शेकडो प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसोबत गव्हाण गावात पोहचले. गव्हाण ग्रामपंचायतीचे शेकापचे माजी सदस्य हेमंत पाटील, महेश पाटील, सचिन कोळी यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करण्यासाठी पथक आले होते. सिडको जोपर्यंत तोडक कारवाई थांबवत नाही तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाही, असा इशारा यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिला. त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे सिडकोच्या अधिकाऱ्यांना नमते घेत कारवाई थांबवावी लागली.

यानंतर भाजपच्या गव्हाण येथील कार्यालयात सिडको अधिकाऱ्यांसोबत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत येत्या दोन ते तीन दिवसात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्यासोबत सिडको अधिकाऱ्यांची बैठक होईल आणि त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत या प्रश्नासंदर्भात बैठकीचे आयोजन केले जाईल. तोपर्यंत कोणत्याही प्रकारची तोडक कारवाई सिडकोने करू नये, असा निर्णय झाला असल्याची माहिती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिली. या बैठकीत झालेल्या निर्णयाला सिडकोच्या अधिकाऱ्यांनीही सहमती दर्शवली आहे.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, प्रितम म्हात्रे, हेमंत ठाकूर, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, अमर म्हात्रे, सचिन घरत, जयवंत देशमुख, वसंत म्हात्रे यांच्यासह सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते आणि प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, सिडको अधिकाऱ्यांचा कारभार हा भोंगळ असल्याचा शिक्का प्रकल्पग्रस्तांनी ठेवला आहे. शासनाने विविध वेळा प्रकल्पग्रस्तांना आश्वासने दिली की, २५० मिटरपर्यंतची घरे नियमित करणार, मात्र अजूनही सिडकोचे अधिकारी हे तोडक कारवाया करतच आहेत.

मी अनेक वर्षापासून शासनाकडे प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्यासाठी पाठपुरावा करत असून सिडकोला सतत सांगत आलोय तुम्ही गावाच्या भोवती रिंग रोड बनवला पाहिजे, पण या कामात सिडकोने सतत चालढकलपणा केल्यामुळे आज ही वेळ प्रकल्पग्रस्तांवर आली आहे, सांगून सिडकोच्या कारभारावर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नाराजी व्यक्त केली.



# शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना पागोटे येथे विनम्र अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यात १९८४ साली झालेल्या गौरवशाली लढ्यातील हुतात्म्यांना ४१व्या स्मृतीदिनी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी व अन्य मान्यवरांनी शुक्रवारी (दि. १७) पागोटे येथे अभिवादन केले.

शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळावा यासाठी प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढा देण्यात आला. या लढ्यात १७ जानेवारी १९८४ रोजी पागोटे येथील महादेव हिरा पाटील, केशव महादेव पाटील आणि कमलाकर कृष्णा तांडेल हे तिघे हुतात्मे झाले होते. त्यांचा स्मृतीदिन दरवर्षी हुतात्मा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने पागोटे येथे आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी हुतात्म्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनीही पागोटे येथे येत हुतात्म्यांना अभिवादन केले.

**उरण : राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष परीक्षित प्रकाश ठाकूर यांच्या नागाव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या वेळी कृषिभूषण प्रकाश ठाकूर आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.**




## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर आणि विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी ( दि. १६) अँटी-रॅगिंग समितीने पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन घेतली. स्पर्धेसाठी महाविद्यालयातील अँटी रॅगिंग हा विषय देण्यात आला होता

या पोस्टर मेकिंग स्पर्धेच्या माध्यमातून महाविद्यालयातील कोणत्याही विद्यार्थ्यांचा छळ करणे, छेडछाड करणे, वागणूक देणे किंवा असभ्यतेने हाताळणे, उद्धट किंवा अनुशासनहीन कृत्यांमध्ये गुंतणे, ज्यामुळे चीड, त्रास किंवा मानसिक हानी होण्याची शक्यता असते अशा कोणत्याही वर्तनाने बोललेले किंवा लिहिलेले किंवा एखाद्या कृतीद्वारे या सर्व गोष्टींपासून दूर राहणे हे या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवगत झाले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी पोस्टर मेकिंग स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले तसेच प्रा. आनंद शेलार प्रा. शिवानी मानकामे प्रा. प्रमोद वाघे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# शिवकर उपसरपंचपदी रवींद्र ढवळे बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे रवींद्र ढवळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सरपंच आनंद ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक झाली. या वेळी दुसरा कोणाचाही अर्ज न आल्याने रवींद्र ढवळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी उपसरपंच संतोष मते, प्रांजल पाटील, सदस्य रितु पाटील, मोनिका पोपेटा, रेश्मा पाटील, मनिषा खळे, सुरेखा टोपले व मंगेश ढवळे यांच्यासह भास्कर पाटील, गोपाळ पाटील, तुकाराम तुपे, गोटीराम ढवळे, आंबो ढवळे, तुकाराम टोपले, वामन ढवळे, लक्ष्मण पाटील, बळीराम भोईर, गणपत टोपले, धोंडू तुपे, शालिकबुवा, माया पाटील, तुकाराम पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी नवनिर्वाचित उपसरपंच रवींद्र ढवळे यांचे अभिनंदन केले.

## बांगलादेशींविरोधात पनवेल पोलिसांची कारवाई

पनवेल : वार्ताहर

देशात बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहिम उघडली असून, १२ वर्षांपासून घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करून पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत बेकायदा वास्तव्यास असलेल्या मोहसीन खोकोन मुल्ला नावाच्या बांगलादेशी नागरिकास पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली.

तालुक्यातील बारवई पूल, मांडे वडापाव सेंटर, खानावळे येथे एक बांगलादेशी नागरिक कामासाठी येणार असल्याची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाली होती. या माहितीनुसार पोलिसांचे पथक सदर ठिकाणी पोहोचले. यावेळी एक इसम वडापाव सेंटर समोर उभा होता. त्याला त्याचे नाव विचारले असता, मोहसीन खोकोन शेख,रा. शिवनगर, चांभारली मोहोपाडा असे असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे भारतीय असल्याबाबतचे कागदपत्र त्यास सादर करण्यास सांगितले. आणि त्याच्याकडे असलेला मोबाईल फोन तपासला असता, बांगलादेशी कॉलिंग कंट्री कोडने सुरु होणारे संपर्क मिळून आले. त्याच्याकडे बांगलादेशातून भारतात येण्याचे पासपोर्ट, विजा, जन्म दाखला, इतर कागदपत्र मागितले असता, त्यांनी ती दिली नाहीत, मात्र त्याच्याकडे आधार कार्ड, मोबाईल फोन मिळून आला. बारा वर्षांपूर्वी भारत- बांगलादेश सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून त्याने भारतात प्रवेश केला आणि तो पनवेल-खालापूर परिसरात राहत असल्याचे त्याने पोलिसांसमोर कबूल केल्याने त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले.

## निवडक

### सायकल दुकानात चोरी

**पनवेल** : एका बंद सायकल दुकानाचे ग्रील लॉक तोडून व शटर कट करून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून आतील रोख रक्कम व चांदीची गणपतीची मुर्ती चोरुन नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

जिग्नेश मारलेशा यांच्या पॅडल पॉवर बाईसिकल या पाटील कॉम्प्लेक्स येथील दुकानाचे ग्रील तोडून व शटर कट करून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून अडीच हजार रुपये रोख रक्कम तसेच २० हजार रुपये किंमतीची अर्ध फुटीची गणपतीची चांदीची मुर्ती चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तरुणी बेपत्ता

**पनवेल** : मोठ्या बहिणीकडे जाते असे सांगून घराबाहेर



पडलेली एक तरुणी अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. संगीता दाभणे (१९ रा.नानोशी) असे या तरुणीचे नाव असून बांधा मध्यम, रंग सावळा, उंची ५ फुट २ इंच, नाक सरळ, डोळे काळे, डोक्याचे केस साधारण लांब असून अंगात निळा चुनीदार ड्रेस आहे. तसेच पायात चप्पल आहे. तीला मराठी भाषा अवगत आहे. सोबत मोबाईल फोन आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. ना.रविंद्र पारधी मो.नं.९३२६०६४६५६ येथे संपर्क साधावा.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयामध्ये शासनाच्या विविध स्कीमवर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १७) महाविद्यालयातर्फे रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्कूल कनेक्ट २.० फॉर एनीइपी २०२० आणि इतर शासनाच्या वेगवेगळ्या स्कीमवर कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी प्रा. एन. सी. वडनरे, सीकेटी महाविद्यालय न्यू पनवेल यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२०बद्दल तसेच इतर शासनाच्या वेगवेगळ्या स्कीम्सविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे तसेच मुख्याध्यापिका निशा नायर या कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विशाल देशमुख यांनी केले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शुभम शर्मा यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवार (दि. १३) रोजी १० वाजता वाणिज्य विभागातर्फे महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर जागृतापर सत्राचे आयोजन केले होते.



या सत्रासाठी मरीना यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना बॉम्बे स्टॉक एक्सचेंज बद्दल तसेच वेगवेगळ्या इन्वेस्टमेंट शेअर मार्केटिंग याविषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या सत्राचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बॉम्बे स्टॉक एक्सचेंज बद्दल, वेगवेगळे इन्वेस्टमेंट व शेअर मार्केटिंग विषयी माहिती व्हावी हा होता.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना सत्रासाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. या सत्राचे आयोजन प्रा. विशाल देशमुख यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे व प्रा. मनोज यादव तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

**पनवेल : न्हावाखाडी महिला मंडळाच्या वतीने येथील मंदिरात हळदीकुंकू आणि सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी शकुंतला ठाकूर, वर्षा ठाकूर, माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी भेट देत दर्शन पुजेचे घेतले. सोबत मंडळातील महिला.**



## संपादकीय

# बहुप्रतिक्षित निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी देण्यात आली. बऱ्याच कालावधीपासून केंद्रीय कर्मचाऱ्यांकडून आठव्या वेतन आयोगाची मागणी होत होती. या घोषणेमुळे केंद्रीय कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असले तरी सरकारसाठी मात्र या अफाट वाढीव खर्चाची सांगड घालणे हे आव्हानात्मकच काम आहे.

**देशभरातील जवळपास एक कोटींहून अधिक केंद्रीय कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना ही मोठी खूशखबर आहे. नवा वेतन आयोग नेमका कधी स्थापन केला जाईल हे अजून स्पष्ट झाले नसले तरी एका वर्षात या आयोगाला शिफारशी सादर कराव्या लागतील. हा वेतन आयोग २०२६मध्ये लागू केला जाईल. आयोगाचा अध्यक्ष व दोन सदस्यांची नियुक्ती लवकरच केली जाईल असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. सातव्या वेतन आयोगाची मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपत असल्याने केंद्रीय सरकारी कर्मचारी या संदर्भातील घोषणेची वाट पाहात होते. सरकारी कर्मचाऱ्यांना सुयोग्य वेतन मिळाले पाहिजे याविषयी कुणाचेच दुमत असणार नाही, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीपासून सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनाची व निवृत्तीवेतनाची वाढत गेलेली आकडेवारी लक्षात घेतली की हा वाढता खर्च निरनिराळ्या सरकारांसाठी का आणि कसा आव्हानात्मक ठरला आहे हे सहज लक्षात येते. वेतनखर्चाच्या या वाढत्या ताणामुळेच रिक्त झालेल्या जागा भरणे जिकिरीचे ठरत असावे. नोकरशाहीतील बड्या अधिकाऱ्यांना नजरेत भरणारे मोठमोठाले लाभ व सुविधा मिळतात हे खरेच. परंतु खाजगी क्षेत्रातील त्याच दर्जाच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांच्या वेतनाची तुलना केली असता मात्र त्यांना मिळणारे वेतन कमीच आहे हेही ध्यानात येते. दिवसेंदिवस अधिक चांगल्या होत चाललेल्या आरोग्यसुविधांमुळे सर्वसाधारण आयुर्मान वाढते आहे. अर्थातच सरकारवरील निवृत्तीवेतनाच्या बोजातही भरच पडत जाणार आहे. सरकारकडे जमा होणाऱ्या करांमध्येही या निवृत्त कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान असतेच. परंतु या चित्राची एक दुसरी बाजूही विचारात घेतली पाहिजे. सरकारी नोकरीत दीर्घकालीन सुरक्षितता आहे व वेतनही उत्तम मिळणार आहे हे ध्यानात घेऊन लाखो तरुण वर्षानुवर्षे सरकारी नोकरी लागण्याच्या प्रतिक्षेत थांबतात. त्या तुलनेत खाजगी क्षेत्राकडे वळणाऱ्या तरुण-तरुणींना सुरुवातीला तुटपुंजे वेतन व असुरक्षितता या दोन्हींचा सामना करावा लागतो. हे अवघे चित्र ध्यानात घेऊन यापुढे वेतन आयोगांनी आपल्या वेतनविषयक शिफारशी करण्याची गरज आहे याकडे तज्ज्ञ लक्ष वेधत आहेत. अन्य देशांशी तुलना करता, भारतातील एकूण नोकरदारांच्या संख्येत सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या बरीच कमी आहे. परंतु तरीही सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा बोजा मात्र बराच मोठा आहे. या गुंत्याची उकलही यापुढील वेतनआयोगांनी करावी अशी अपेक्षा व्यक्त होते आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ७० वर्षांचा वेतन इतिहास याकरिता ध्यानात घ्यावा लागेल. १९४६-४७मध्ये पहिला वेतन आयोग स्थापन करण्यात आला तेव्हा किमान वेतन ५५ रुपये होते व कर्मचारी संख्या १५ लाख होती. २०१४मध्ये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार किमान वेतन १८ हजार रूपयांवर गेले होते व निवृत्तीवेतनधारकांसह कर्मचारी संख्या एक कोटींहून अधिक झाली होती. आजच्या घडीला देशात ४९ लाखांहून अधिक केंद्रीय कर्मचारी आहेत तर निवृत्तीवेतनधारकांची संख्या ६५ लाखांहून अधिक आहे. निव्वळ या आकड्यांवरून सरकारसमोरील आव्हानाचा अंदाज यावा.**

# थोर समाजसुधारक महादेव गोविंद रानडे



महादेव गोविंद रानडे हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ व ब्रिटिश भारतामधील न्यायाधीश होते. शिक्षणाचा प्रसार व्हावा, स्त्रियांनाही शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी मुलींच्या शाळा सुरू केल्या. त्यांनी शिक्षण, समाजसेवा, राजकारण तसेच आर्थिक बाबतीत अमूल्य कार्य केले.

महादेव गोविंद रानडे यांचा १८ जानेवारी १८४२ जन्म नाशिकमधील निफाड या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापुरात झाले. १८५६ नंतर ते आणि त्यांचे मित्र विनायक जनार्दन कीर्तने मुंबईत शिक्षणासाठी एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये दाखल झाले. इतिहास आणि अर्थशास्त्र हे त्यांचे आवडीचे विषय राहिले. मॅट्रिक, एमए नंतर ते १८६६ साली ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले. मुंबई विद्यापीठाचे पहिले भारतीय फेलो म्हणून त्यांची निवड झाली.

रानडे यांचा पहिला विवाह १८५१ साली वयाच्या ११-१२व्या वर्षी वाईतील दांडेकरांच्या रमा नावाच्या मुलीशी झाला. पण त्यांचे १८७३ साली निधन झाले. माधवरावांचे विधवांच्या पुनर्विवाहासंबंधीचे विचार आणि त्या चळवळीतील त्यांचा सहभाग लक्षात घेता ते एखाद्या विधवेशी लग्न करतील अशी अटकळ त्यांच्या वडिलांनी बांधली आणि त्या सालच्या नोव्हेंबरच्या ३० तारखेला अण्णासाहेब कुर्लेकर यांच्या कन्येशी त्यांनी माधवरावांचा विवाह करून दिला. लग्नानंतर माधवरावांनी या पत्नीचे नावही रमा असेच ठेवले. पुढे त्यांनी रमाबाईंना शिकवले.

इ.स. १८७८ साली पुणे येथे झालेल्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनचे ते अध्यक्षही होते. १८८५ मध्ये ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती झाले. न्या.रानडे यांना आधुनिक भारताच्या इतिहासात महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीत महत्त्वाचे स्थान आहे.

रानडे यांनी स्वातंत्र्यासाठी व सामाजिक सुधारणांसाठी कायम घटनात्मक व सनदशीर मार्गांचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील 'मवाळ' प्रवाहाचे ते नेते होते. त्यांनी भारतीय राजकारणात अर्थशास्त्रीय विचार आणला. स्वदेशीच्या कल्पनेला त्यांनी शास्त्रशुद्ध आणि व्यावहारिक स्वरूप दिले. त्यांनी भारतातील दारिद्र्याच्या प्रश्नाचे मूलभूत विवेचन करून येथील दारिद्र्याची कारणे व ते दूर करण्याचे उपाय यासंबंधी अभ्यासपूर्ण विचार मांडले.

भारतीय समाजात संकुचित वृत्ती, जातिभेदांचे पालन असे दोष दूर करूनच आपल्या समाजाची प्रगती साधता येईल असे त्यांचे ठाम मत होते. ज्याप्रमाणे गुलाबाचे सौंदर्य व सुगंध हे जसे वेगळे करता येत नाहीत, त्याप्रमाणे राजकारण व सामाजिक सुधारणा यांची फारकत करता येत नाही असे त्यांचे मत होते. हे विचार त्यांनी समाजसुधारणा चळवळीच्या अगदी सुरुवातीच्या काळात मांडल्यामुळे त्यांना 'भारतीय उदारमतवादाचे उद्गाते', असेही म्हटले जाते.

दिनांक ३१ मार्च, इ.स. १८६७ रोजी न्यायमूर्ती रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. रा. गो. भांडारकर, वामन आबाजी मोडक इत्यादी मंडळींनी पुढाकार घेऊन मुंबईत 'प्रार्थना समाजा'ची स्थापना केली. समाजसुधारणांसाठी रानडे यांनी पुढाकार घेऊन 'भारतीय सामाजिक परिषदेची' स्थापना केली. जातिप्रथेचे उच्चाटन, आंतरजातीय विवाहांस परवानगी, विवाहाच्या वयोमर्यादेत वाढ, बहुपत्नीकत्वाच्या प्रथेस आळा, विधवा पुनर्विवाह, स्त्री-शिक्षण, तथाकथित जाति-बहिष्कृत लोकांच्या स्थितीत सुधारणा, हिंदू-मुसलमानांच्या धार्मिक मतभेदांचे निराकरण अशा या संस्थेच्या मागण्या होत्या. भारताच्या स्वातंत्र्यात पुढे मध्यवर्ती भूमिका बजावणाऱ्या 'राष्ट्रीय काँग्रेस' या संघटनेच्या स्थापनेतही (इ.स. १८८५) न्यायमूर्ती रानडे यांचा मोठा सहभाग होता.

अनेक घटनांच्या संदर्भात त्यांना टीका सहन करावी लागली. त्यांच्या कामांबद्दल लोकांमध्ये रोष होता कारण तेव्हा समाजसुधारकांना फार विरोध होई. माधवरावांच्या या समाजसुधारकी कामालाही सनातनी वर्गाकडून सतत विरोध झाला. माधवरावांनी तो विरोध सहनशीलतेने आणि समजुतीने हाताळला.

रानडे यांनी १६ जानेवारी १९०१च्या रात्री जस्टीन मेकार्थी याचे 'हिस्ट्री ऑफ अवर ओन टाईम्स' हे पुस्तक वाचायला घेतले आणि पुस्तक वाचायला बसले नाहीत तोवर त्यांना त्रास सुरु झाला व त्यांची जीवनयात्रा संपली. **(साभार : इंटरनेट)**

# नाट्यछटाकार शंकर काशिनाथ गर्गे उर्फ दिवाकर



दिवाकर उर्फ शंकर काशिनाथ गर्गे यांचा जन्म १८ जानेवारी १८८९ या दिवशी आणि मृत्यु १ ऑक्टोबर १९३१ या दिवशी झाला, अर्थात फक्त ४१ वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले. ४१ वर्षे जगून नि फक्त ५१ नाट्यछटा लिहून दिवाकर मराठी साहित्यात अमर झाले आहेत ही खरोखरच आश्चर्यचकित करणारी गोष्ट आहे. या सगळ्या नाट्यछटा एकत्र केल्या तर त्यांनी फक्त काही पाने भरतील, तरीही मराठी साहित्याचा मागोवा घेणारा ग्रंथ जेव्हा लिहिला जाईल, तेव्हा दिवाकर आणि नाट्यछटांचे नाव त्यात असणार यात काय शंका?

दिवाकरांच्या चार नाट्यछटांविषयी आपण या लेखमालिकेत बोलणार आहोत. यातल्या पहिल्या दोन नाट्यछटा दिवाकरांच्या अतिशय गाजलेल्या नाट्यछटा आहेत तर ईतर दोन नाट्यछटा दिवाकरांच्या सर्वोत्कृष्ट नाट्यछटांमधे गणल्या जात नसल्या तरी वैयक्तिकरित्या मला आवडणा-या आहेत.

पहिली नाट्यछटा

'पंत मेले, राव चढले'!

'पंत मेले, राव चढले' ही एकमेकाविरोधी दोन प्रसंगांचे चित्रण करणारी एक उत्कृष्ट नाट्यछटा आहे. जेव्हा कुठेतरी सुर्योदय होत असतो तेव्हा दुसरीकडे कुठेतरी सूर्यास्त होत असतो हा निसर्गनियम सिद्ध करणारी ही छटा आहे दोन भागांतली. पहिला प्रसंग आहे दिवाकरपंतांच्या घरातला. पंतांचे नुकतेच निधन झाले आहे नि त्यामुळे त्यांच्यानंतर त्यांच्याघरची स्थिती हलाखीची झालेली आहे. पंतांचे घरची परिस्थिती गरीब नि पंत हे घरातले एकमेव कमावते सदस्य, त्यामुळे ते गेल्यावर कुटुंबाचा आधारच हरवल्यासारखा झाला आहे. बरोबर आहे, जेमतेम उत्पन्न असलेले घर ते, घरातला कर्ता माणूस गेल्यावर घरचा गाडा चालणार कसा? पण अशा परिस्थितीतही पंतांच्या पत्नींनी धीर सोडलेला नाही, आपल्या तीन मुलांची जबाबदारी आता आपल्या एकट्यावर आहे हे पक्के माहिती असल्यामुळे त्या लोकांची भांडी घासणे, दळण दळणे, धुणी धुणे अशी कामे करून आपला संसारगाडा ओढण्याचा नेटाने प्रयत्न करीत आहेत. त्यांचा मोठा मुलगा सगळी लाज बाजूला सोडून माधुकरी मागून त्यांना मदत करतो आहे. ह्या मोठ्या मुलाचे मनोगत हाच या नाट्यछटेचा पहिला भाग आहे.

साधे पण परिणामकारक संवाद लिहून सगळा प्रसंग आपल्यासमोर उभा करण्याचे दिवाकरांचे सामर्थ्य ह्या नाट्यछटेत विशेषत्वाने दिसते.

दिवाकरांनी ही नाट्यछटा लिहिली १७ मे १९१२ रोजी, म्हणजे ह्या १७ मेला या नाट्यछटेने ९८ वर्षे पूर्ण केली, तब्बल ९८ वर्षे! काम, क्रोध, ईर्षा, मत्सर, प्रेम, द्वेष अशा माणसाच्या मूळ भावनांचे ओबडधोबड पण सच्चे चित्रण करणारे साहित्य ते उत्कृष्ट साहित्य अशी उत्कृष्ट साहित्याची साधीसोपी व्याख्या करता येईल आणि माझ्या मते दिवाकरांची ही नाट्यछटा हा निकष अगदी १००% पूर्ण करते.

खरे साहित्य कधीही शिळे होत नाही, कारण ते असते अस्सल, मानवी स्वभावाचे अगदी खरेखुरे चित्रण करणारे! दिवाकरांची ही नाट्यछटाही तशीच आहे, ९८ वर्षांची होऊनही तिच्यातला सच्चेपणा अगदी थोडासाही कमी झालेली नाही आणि त्यामुळेच ती आजही तितकीच अस्वस्थ करणारी आहे! **(साभार : साहित्य फुलोरा)**



## बदलते तंत्रज्ञान

# मायक्रोसॉफ्ट कंपनीत 'या' भारतीयाकडे मोठी जबाबदारी



टेक जायंट मायक्रोसॉफ्टने थर्ट पार्टी ग्राहकांसाठी Ai ॲप्स आणि टूल्स तयार करण्यासाठी नवीन टीम तयार केली आहे. 'कोअर एआय - प्लॅटफॉर्म अँड टूल्स', असे या टीमला नाव देण्यात आले आहे. विशेष म्हणझे, या टीमचे नेतृत्व एका भारतीयाच्या खांद्यावर असेल. भारतीय वंशाचे जय पारीख (Jai Parekh) या टीमचे प्रमुख असतील. त्यांनी यापूर्वी सायबर सिक्युरिटी स्टार्टअप लेसवर्कचे सीईओ आणि मेटामध्ये प्रमुख पदावर काम केले आहे. आता मायक्रोसॉफ्टमध्ये त्यांना महत्वाची जबाबदारी मिळाली आहे.

३ वर्षात ३० वर्षांचा बदल

नवीन टीमबाबत सत्या नडेला म्हणाले की, या नवीन बदलामुळे ॲप्लिकेशन कॅटेगरीज प्रभावित होतील. पण, ३ वर्षात ३० वर्षांचा बदल अपेक्षित आहे. दरम्यान, सुमारे १० महिन्यांपूर्वी मायक्रोसॉफ्टने डीपमाइंडचे सह-संस्थापक मुस्तफा सुलेमान यांना कोपायलट एआय मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त केले होते. आता पारीख सुलेमानसोबत कंपनीत एकत्र काम करणार आहेत.

ऑक्टोबरमध्ये मायक्रोसॉफ्टमध्ये रुजू

पारीख गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये मायक्रोसॉफ्टमध्ये कार्यकारी उपाध्यक्ष म्हणून रुजू झाले होते. ते कंपनीच्या सीनिअर टीमचा भाग आहेत. मायक्रोसॉफ्टचे अनेक अधिकारी जय पारीख यांना रिपोर्ट करतील. यामध्ये एआय प्लॅटफॉर्म हेड एरिक बॉयड, एआय इन्फ्रास्ट्रक्चर डेप्युटी सीटीओ जेसन टेलर, मायक्रोसॉफ्ट डेव्हलपर डिव्हिजन हेड ज्युलिया लियसन इत्यादींचा समावेश आहे.

पारीख यांची कारकीर्द


व्हर्जिनिया टेक्निकल युनिव्हर्सिटीमधून शिक्षण पूर्ण केलेले जय पारीख २००९ मध्ये फेसबुक कंपनीत रुजू झाले. या काळात त्यांनी कंपनीच्या तांत्रिक पायाभूत सुविधा आणि डेटा सेंटर प्रकल्पांवर काम केले. कंपनी सोडण्यापूर्वी ते इंजीनिअरिंग टीमचे प्रमुख होते. मेटाच्या अक्विला ड्रोन प्रकल्पासह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांवरही त्यांनी काम केले आहे. यानंतर त्यांनी लेसवर्कचे सीईओ म्हणून काम केले.

# प्रतिभावंत कवी हरिवंशराय बच्चन

हरिवंशराय बच्चन हे प्रसिद्ध हिंदी कवी होते. त्यांचा जन्म २७ नोव्हेंबर १९०७ रोजी अलाहाबाद येथे एका कायस्थ कुटुंबात झाला. हरिवंशराय यांना लहानपणी कौतुकाने सर्वजण बच्चन म्हणत आणि पुढे याच नावाने त्यांनी लेखनही केले. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त लेख...

हरिवंशराय यांच्या वडिलांचे नाव प्रतापनारायण. हरिवंशराय यांचे आरंभीचे शिक्षण उर्दूतून झाले. घरची गरिबी त्यामुळे शिक्षणात खूप अडथळे आले. १९२९मध्ये अलाहाबाद विद्यापीठातून ते पहिल्या वर्गात बीए झाले. १९३८मध्ये एमए व १९३९मध्ये बनारस येथून ते बीटी झाले. १९४२ पासून अलाहाबाद विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून ते काम करू लागले. डब्ल्यू. बी.येट्स (१८६५-१९३९) या प्रसिद्ध आयरिश कवीवर डब्ल्यू. बी. येट्स अँड ऑकल्टिझम (१९६५-ग्रंथरूपाने प्रसिद्ध) हा प्रबंध लिहून त्यांनी केंब्रिज विद्यापीठाची पीएचडी मिळविली (१९४५). १९५५मध्ये अलाहाबाद आकाशवाणीवर हिंदी विभागाचे निर्माता म्हणून त्यांनी काही काळ काम केले.

हरिवंशराय यांचे 'मधुशाला' (१९३५), 'मधुबाला' (१९३६) 'मधुकलश' (१९३७) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले



## निमित्त

आणि हिंदी काव्यातील 'हालावादा'चा प्रवाह सुरू झाला. ते हालावादी बनण्याचे मुख्य कारण त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये सापडते. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी लहानपणापासून करावा लागलेला झगडा, पहिल्या पत्नीचा क्षयाने झालेला मृत्यू यांसारखी कारणे त्यामागे आहेत. या व्यथित अवस्थेत असतानाच एडवर्ड फिट्सजेरल्ड (१७६३-९८) यांनी अनुवादिलेल्या 'उमर खय्याम' यांच्या रूबायांचा प्रभाव त्यांच्यावर पडला.

हालावाद हा भौतिक सुखवादाचा, मदिरा, व मदिराक्षी यांच्या कैफात प्राप्तकाल जगण्याचा, निदर्शक आहे. मध्यमवर्गीय सुशिक्षितांच्या मनातील 'ध्येय की सुख?', 'कर्ममय जीवन की निष्क्रीय सुखासीन जीवन?', भौतिकता की आध्यात्मिकता ही सारी द्वंद्वे त्यांच्या काव्यात व्यक्त झाली. पुढे त्यांच्यावर महात्मा गांधींच्या राजकीय कार्याचा प्रभावही पडला. 'निशा निमंत्रण' (९१३८) आणि 'एकांत संगीत' (१९३९) यांसारख्या त्यांच्या काव्यसंग्रहांतील विषादमयता जाऊन सतरंगिनी (१९४५) व 'मिलन यामिनी' (१९५०) यांत उल्हासित मनोवृत्ती प्रकट झाली आणि 'खादी के फूल' (१९४८), 'सूत की माला' (१९४८) या काव्यसंग्रहांतून ती सामाजिकतेत परिणत झाली.

दुर्बोध, अतिअंतर्मुख व अमूर्त ठरलेल्या छायावादी हिंदी कवितेला कंटाळलेल्या वाचकांना व श्रोत्यांना आपल्या सरळ, सुबोध, परंतु सरस काव्यरचनेने आणि विशेषतः व्यासपीठावरून आकर्षकपणे केलेल्या काव्यगायनाने त्यांनी हजारो रसिकांना मोहून टाकले. काव्याची गोडी कायम राखली व वाढविलीही. संस्कृतप्रचुर तसेच प्रतीकांच्या व प्रतिमांच्या बाहुल्याने नटलेल्या शैलीचा त्याग करून व्यावहारिक भाषेशी काव्याची पुन्हा जुळणी करून देण्याचे महत्वाचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले. उर्दू शब्दकळा व लकबी यांचा खुबीदार उपयोग आपल्या हिंदी कवितेत त्यांनी करून घेतला. अशा या प्रतिभावान कवीचे १८ जानेवारी २००३ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात 'अशी' वाढवा रोगप्रतिकारक शक्ती

थंडीचा हंगाम जोरात सुरू आहे. या ऋतूमध्ये आपली रोगप्रतिकारक शक्ती खूप कमकुवत होते. थंडीपासून शरीराचा बचाव करण्यासाठी आहाराच्या बाबतीतही तयारी करायला हवी. आहारात काही पदार्थांचा समावेश केला, तर ही थंडी नक्कीच सुखकर आणि प्रतिकारशक्ती वाढवणारी होऊ शकेल. दैनंदिन आहारात काही गोष्टींचा समावेश करणे फायदेशीर ठरेल, असे मत हैदराबादच्या डॉ. सुषमा कुमारी यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी हिवाळ्यात प्रतिकारशक्ती वाढवणारे सुपर फूड्स सांगितले आहे.



जीवनसत्त्व कसह समृद्ध असलेले संत्री आणि लिंबू यांसारखी लिंबूवर्गीय फळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी आणि ॲलर्जीच्या प्रतिक्रियांशी लढण्यासाठी उत्तम आहेत. हिवाळ्यात संत्र्याचे सेवन करू शकता. यात जीवनसत्त्व क असते, ज्यामुळे प्रतिकारशक्ती मजबूत होते.

जीवनसत्त्व अ आणि अँटिऑक्सिडंट्सचा खजिना मानली जाणारी ब्रोकोली हे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते. तज्ज्ञांच्या मते, एक कप ब्रोकोलीमध्ये संत्र्याइतकेच जीवनसत्त्व क मिळते. ब्रोकोलीमध्ये बीटा-कॅरोटीन, पोटॅशियम, मॅग्नेशियम, जस्त व लोह भरपूर प्रमाणात असते.

हिवाळ्यात लसणाचे सेवन करणे खूप फायदेशीर मानले जाते. लसणामध्ये असे अनेक गुणधर्म आढळतात; जे सर्दी व फ्ल्यूसारख्या आजारांशी लढण्यास आणि प्रतिबंध करण्यास मदत करतात.

आले खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. आल्यात जीवनसत्त्व क असते. हे जीवनसत्त्व रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते.

पालकामधील अँटी-ऑक्सिडंट्स, लोह व बीटा कॅरोटीन शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. पालकामध्ये लोह मुबलक प्रमाणात असते.

दही हे प्रो-बायोटिक असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीसाठी चांगले आहे. त्यामध्ये कॅल्शियम, जीवनसत्त्व ब-१२ व फॉस्फरसदेखील मुबलक प्रमाणात असते.

अनेक पोषक घटकांनी समृद्ध नट आणि सीड्स आरोग्य सुधारण्यास खूप मदत करतात. जर तुम्हाला हिवाळ्यात निरोगी राहायचे असेल, तर तुम्ही तुमच्या आहारात बदाम, अक्रोड व फ्लेक्स सीड्स इत्यादींचा समावेश करू शकता. त्यामध्ये खूप जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. त्यांचे आरोग्याला खूप लाभ होतात.

# सह्याद्री पतसंस्थेची आर्थिक स्थिती भक्कम

## अफवांवर विश्वास ठेवू नये –चेअरमन अॅड. राजीव साबळे

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या सह्याद्री ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था या पतसंस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून ज्यांनी आर्थिक घोटाळा केला आहे, त्यांच्यावर कायदेशीर आणि पोलीस कारवाई करून गैर व्यवहार झालेली सर्व रक्कम तातडीने वसूल करण्यात येईल. या पतसंस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक असून सभासद, ठेवीदार यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन या पतसंस्थेचे चेअरमन ड. राजीव साबळे यांनी माणगांव येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले आहे.



सह्याद्री पतसंस्थेच्या एकूण सात शाखा आहेत. त्यापैकी गोरेगाव शाखेत शाखाधिकारी व अन्य तिघांनी मिळून सोने तारण कर्जामध्ये गैरव्यवहार करून पतसंस्थेची फसवणूक केली आहे. याबाबत गोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून गैरव्यवहार करणाऱ्या प्रदीप भोनकर या आरोपीला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी अतुल चेरफळे याला तपासासाठी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच अन्य संशयितांची पोलीस चौकशी सुरू आहे.

या प्रकरणात कुणाचीही गय केली जाणार नसून संबंधित गैर व्यवहार करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. संशयित आरोपी यांच्याकडून कायदेशीर कारवाई करून सुमारे ४० लाख रुपये वसूल करण्यात येणार आहेत. त्यांची स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे संस्थेच्या संबंधित ठेवीदारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन चेअरमन ड. राजीव साबळे यांनी पत्रकार परिषदेत केले.

सह्याद्री पतसंस्थेच्या सभासदांनी सुमारे ३६ कोटी १७ रुपयाच्या ठेवी ठेवून पतसंस्थेवर विश्वास दाखविला आहे. सुमारे ३१ कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे. पतसंस्थेचे एकूण ४७ कोटी ८३ लाख रुपयांचा भाग खेळते भांडवल असून वसुलभाग भांडवल ३ कोटी ६१ लाख आहे. दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत केवळ २% थकबाकी असून तब्बल ९८% कर्ज वसुली झाली आहे. गतवर्षी पतसंस्थेला ४० लाख रुपयांचा नफा झाला होता. या आर्थिक वर्षामध्ये तो दुप्पट होऊन ८० लाख झाला आहे. ऑडिटचे 'अ' दर्जाचे मानांकन मिळाले आहे. या पतसंस्थेत अतिशय पारदर्शक कामकाज सुरू असून कोणालाही शंका असल्यास कार्यालयात जाऊन खातरजमा करावी आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन ड. राजीव साबळे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला पतसंस्था चेअरमन ऍड. राजीव साबळे, व्हाईस चेअरमन चंद्रशेखर देशमुख, संचालक वैभव साबळे, शैलेश भोनकर, सूर्यकांत काळे, प्रकाश तळकर, दिलीप शेठ, सचिन शेडगे उपस्थित होते.

## रिक्षाचालकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीला वाईट हेतूने अश्लील व्हिडिओ दाखवून तिचा विनयभंग करणारा रिक्षाचालकाविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार पीडित १० वर्षे वयाची विद्यार्थिनी मोहपाडा येथील जनता विदयालय इंग्लिश मिडीयम स्कूल येथे शिकत असून आरोपीच्या रिक्षातून येजा करत असे.

१६ नोव्हेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान रिक्षामधून पिडीता घरी परत येत असताना ती अल्पवयीन व अनुसुचित जाती जमातीची आहे हे माहीत असताना देखील रिक्षाचालकाने मोबाईल फोनमधील अश्लिल व्हिडीओ तीन ते चार वेळा दाखविले. मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन वारंवार होत असल्याने तिने ही बाब घरी पालकांना सांगितली. या घटनेने हादरलेल्या पालकांनी रसायनी पोलीस ठाण्यात रिक्षा चालक रुपेश दत्ता पारिंगे (वय ३५, रा. वयाळ, ता. खालापूर) याच्याविरोधात तक्रार दिली. बालकांचे अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे वारदोली, ता.पनवेल, जि. रायगड येथील **अजय बाळाराम भगत व इतर ३** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे वारदोली, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १) अजय बाळाराम भगत<br>२) संजय बाळाराम भगत<br>३) विद्या गणपत भगत<br>४) गितांजली गणपत भगत अ.पा.क. आई विद्या गणपत भगत | ४६ | १ | ०–६४–४०<br>पो.ख. ०–०७–१०<br>**०–७१–५०** | ९.८१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्बेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०१/२०२५

**सही / –**
**अॅड. श्री. अमोल शंकर साखरे**

शॉप नं.१२८, नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो.८६५२२३३७७१/९३२४३७२१६६

## सोमजाई मातेच्या दर्शनासाठी भक्तगणांची अलोट गर्दी...!



**माणगाव : बातमीदार**

निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या मांगवली येथे दरवर्षी सोमजाई मातेचा उत्सव सोहळा मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. यावर्षी माणगांव तालुक्यातील नवसाला पावणारी भक्तांच्या हाकेला धावणारी श्री क्षेत्र मांगवली येथील जागृत देवस्थान असलेल्या सोमजाई देवीचा उत्सव सोहळा नुकताच मांगवली येथे मोठ्या उत्साहात पार पडला

या सोहळ्यासाठी सर्व आजूबाजूच्या तसेच बाहेरून येणाऱ्या देवीच्या भक्त गणांनी उपस्थित राहून देवीच्या दर्शनाचा व तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. या सोमजाई मातेचे दर्शन घेण्यासाठी माणगांव नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, रोहा उपनगराध्यक्ष महेश कोल्हटकर, पद्माकर उभारे यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली होती.

या कार्यक्रमाचे आयोजन सोमजाई मातेचे भक्त तसेच छावा संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष विजय पाखुर्डे, मांगवली हे दरवर्षी स्वखर्चाने करत असतात त्यांना मांगवली ग्रामस्थ व महिला मंडळ आणि मुंबईकर मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## श्रीवर्धनमध्ये आंबा मोहोरल्याने आनंदाची लाट, यंदा उत्पादनात आशादायक वाढ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात यंदा आंब्याच्या मोहोराने बागायतदारांची आशा पुन्हा एकदा पल्लवित केली आहे. सध्या प्रतिकूल हवामानामुळे आंब्याच्या मोहोराचे सुंदर रूप धारण झाले असून, येत्या एप्रिल ते मे महिन्यात या मोहोरातून संपूर्ण तालुक्यात चांगला आंबा उत्पादन होण्याची शक्यता आहे. यंदा चार हजार टन आंब्याचे उत्पादन होईल, अशी अपेक्षाही बागायतदारांनी व्यक्त केली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये निसर्गाच्या संकटांनी या भागातील आंबा उत्पादकांना अडचणींचा सामना करावा लागला होता. तौक्ते चक्रीवादळामुळे आंब्याच्या अनेक झाडांची पडझड झाली होती. तरीही, या आपत्तीनंतर बागायतदारांनी झाडांची निगा राखून, नव्या आंब्याच्या लागवडीवर जोर दिला आहे. आता जेव्हा मोहोर आल्यावर बागायतदार आणि शेतकरी वर्ग उत्साही आणि आनंदी दिसत आहेत.



आंब्याच्या मोहोराची प्रक्रिया नोव्हेंबरपासून फेब्रुवारीपर्यंत सुरू होते. या मोहोरांच्या माध्यमातून आंब्याच्या फळांचा आकार व गुणवत्ता ठरते. मोहोर आले की साधारणपणे १०० ते १२० दिवसांत आंबे फळ धारण करण्यास तयार होतात. या वर्षी वातावरण अत्यंत अनुकूल असून, बागायतदारांना आंब्याच्या उत्पादनाबाबत पूर्ण विश्वास आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील डोंगर उतार आणि वरकस पडीक जमिनी आंब्याच्या पिकासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. आंबा उत्पादक या हंगामात उत्तम नफा कमविण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

**शेतकऱ्यांना आवाहन आहे की, आंब्याच्या बागेत कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार वेळेवर कीटकनाशक व बुरशीनाशकांची फवारणी करा. यामुळे फळांची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता सुधारेल, आणि यंदाच्या हंगामात चांगला नफा मिळवता येईल.**
**–श्रद्धा डुंबरे, कृषी अधिकारी,**

**श्रीवर्धन तालुक्यात यंदा चार हजार टन आंबा उत्पादनाची अपेक्षा आहे, आणि एप्रिल ते मेदरम्यान फळ काढणीसाठी योग्य वातावरण आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे नुकसानीनंतर पहिल्यांदाच आंब्याच्या उत्पादनासाठी अनुकूल हवामान आहे.**
**–तैयद बिजापुरी, आंबा बागायतदार**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

**मौजे–लोणीवली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ८४/४/अ | ०–५८–१३<br>पो.ख. ०–११–८७<br>एकूण ०–७०–०० | ३.८६ | सिताबाई राघो पाटील<br>ज्ञानेश्वर राघो पाटील<br>आश्विनी चंद्रकांत पाटील |
| ८४/४/क | ०–४९–९३<br>पो.ख. ०–११–८७<br>एकूण ०–६१–८०<br>पैकी तुकाराम विठू पाटील यांच्या हिश्याचे क्षेत्र वगळून<br>उर्वरीत ०–२८–८५ | ३.८५ | पद्माकर राघो पाटील<br>सौरव हनुमान पाटील<br>केतन सुभाष पाटील<br>मनिष हनुमान पाटील<br>शुभम सुभाष पाटील<br>उमेश बाळाराम पाटील<br>दिनेश बाळाराम पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल.
दि. १७/०१/२०२५.

**सही/–**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

## कर्जत परिसरात आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथे अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत सापडल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. सदर मृत व्यक्ती चार ते पाच दिवसांपूर्वी मयत झाल्याचे सांगण्यात आले. मयत व्यक्ती फिरस्ता असल्याचा अंदाज आहे. ही हत्या की आत्महत्या यामुळे परिसरात एकाच खळबळ उडाली आहे.

कर्जत शहराला जोडलेल्या कर्जत मुरबाड रस्त्यावरील रेल्वे पुलाजवळ हा मृतदेह येथील स्थानिकांना दिसून आला. येथे रेल्वे कर्मचारी यांना राहण्यासाठी बांधण्यात आलेल्या रेल्वे कॉटर चाळीच्या मागच्या बाजूला निर्जनस्थळी झाडांच्या झुडपात हा मृत देह पडलेला होता. परिसरात दुर्गंधी सुटली होती त्यामुळे ही घटना सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

कर्जत पोलीसांनी घटनेची माहिती मिळताच तेथे येउन पुरुष जातीचा हा मृतदेह शवविच्छेदनासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला.

### हरकत नोटीस

सदर हरकत नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या वर्तमान पत्रातील जाहीर नोटीसीस हरकत घेण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खाली नमुद वर्णन केलेल्या दळी भूखंड / जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सिताराम कंबा कातकरी श्री. नथुराम रामदास कातकरी, व इतर भोगवटाधारकांनी त्यांचे हिश्श्याची मिळकतीचे विक्री व्यवहार दिनांक २२/०४/२०२२ रोजी करण्यांत आलेला असून सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन येणे प्रमाणे :–

**मौजे चिरनेर, तालुका उरण, जिल्हा रायगड येथील दळी जमिन मिळकत**

| भूखंड क्रमांक | उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौरस मिटर |
|---|---|---|
| ६५ | ० | २४५५ ४०.०० चौ.मि. (२४.५५ हेक्टर) |

येणेप्रमाणे वर्णनाच्या जमिन मालकांनी आमच्या अशिलांबरोबर विक्री व्यवहार केलेला असून दस्तएवेजांवर सहया निशाण्या मे. नोटरी सो. यांचे समोर करण्यांत आल्या असून मोबदल्याच्या रक्कमा चेक व रोख स्वरूपात आमच्या अशिलांकडून स्विकारून सदर मिळकतीचे विक्री व्यवहार निश्चित केलेला आहे. तसेच दस्तऐवज बनविण्यांत आलेले आहेत. सदर मिळकतीची हस्तांतरणांची प्रक्रीया चालू आहे.

तरी संबधितांनी सदर मिळकतीचे मालकांसोबत कोणत्याही प्रकारचे विक्री व्यवहार करू नयेत. सबब सदर जमिन मिळकतीचे मालकांसोबत विक्री व्यवहार करणेस आमचे अशिलांची सक्त हरकत नोटीसीव्दारे कळविण्यांत येत आहे.

यानंतर आपण सदर दळी जमिन मिळकतीचे मालकांबरोबर विक्री व्यवहार करून मोबदल्याची रक्कम देवून आपली फसवणूक किंवा नुकसानी झाल्यास त्यास संपूर्ण आपण स्वत:च जबाबदार असाल याची कृपया खबरदारी घ्यावी असे हया हरकत नोटीसीने कळविण्यांत येत आहे.

दिनांक : १७/०१/२०२५

**सही/–**
**अॅड. कांचन एस. पाटील**
बी.ए.एल.एल.बी

पत्ता – ऑफिस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी पी पारसिक बॅकेवरती, लाईफ लाईन हॉस्पीटलजवळ पनवेल बस स्टॅन्ड समोर, पनवेल जि, रायगड ४१० २०६.
फोन : ८६८९८०९८९६ / ८९०८८८२६११

**महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ३१ व महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ मधील नियम ४८ व प्रकरण ११ च्या आणि तद्न्वये केलेल्या नियमानुसार जमिनीची जाहीर लिलावाने विक्री करण्यांबाबतचा जाहीरनामा.**

### सरकारी जमिनीच्या विक्री बाबतचा जाहिरनामा

सर्व तमाम लोकांस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यांत येत आहे की, ज्याअर्थी, मौजे वावर्ले, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील तपशिलात नमूद केलेल्या खाणीकडे वापरांत असलेल्या सरकारी बिनआकारी पड जमिनीची महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम ३१ व त्याखालील नियमानुसार जाहीर लिलावाद्वारे, त्यापुढे नमूद केलेल्या प्रमाणभूत किंमतीस किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीस विक्री करण्यांबाबत मा. जिल्हाधिकारी साहेब रायगड–अलिबाग यांनी मा. उपविभागीय अधिकारी कर्जत यांना दिलेल्या निर्देशानुसार मा. उपविभागीय अधिकारी कर्जत यांनी त्यांचेकडील पत्र क्र. उविअ / जमिनबाब / कात–७/कलम ३१ कार्यवाही/२०२४ /१६३२ दिनांक २६/७/२०२४ अन्वये तहसिलदार खालापूर प्राधिकृत करण्यांत आलेले आहे.

**लिलाव करण्याच्या जमिनीचा तपशिल**

| गावाचे नांव व तालुका | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | मा. मुद्रांक जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी निर्धारित केलेली जमिनीची प्रमाणभूत किंमत |
|---|---|---|---|
| वावर्ले ता. खालापुर | ३३५ | ०–५७–०० | र.रु ९३,१४,५००/– |

त्याअर्थी, मी तहसिलदार खालापूर उक्त जमिनीचा जाहिर लिलाव दिनांक ३०/०१/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता माझ्या खालापूर येथील कार्यालयाच्या दालनात ठेवलेला आहे. त्यानुसार या लिलावामध्ये भाग घेण्यांची ज्यांची इच्छा असेल अशा व्यक्तिनी उक्त दिवशी व वेळी माझ्या कार्यालयात उपस्थित रहावे.

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.**

१) मिळकतीच्या निर्धारित केलेल्या रु. ९३,१४,५००/– या प्रमाणभूत किंमती इतकी किंवा त्यापेक्षा जास्त बोली बोलणा–या व्यक्तिच्या नांवे लिलाव मंजूर करण्यांत येईल.
२) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ चे कलम २०० मध्ये नमूद केल्याप्रमाणे लिलावामध्ये बोली बोलणाऱ्या व्यक्तिने, बोललेल्या रक्कमेच्या २५% टक्के इतकी रक्कम लिलावाच्या दिवशी लिलाव अधिकारी यांजकडे अनामत म्हणून जमा केली पाहिजे. तसे न केल्यास सदरची मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीस काढणेंत येईल.
३) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ कलम २०२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लिलावाद्वारे जमिन खरेदी करणारे, खरेदीदाराने खरेदीची संपूर्ण रक्कम विक्री ज्या तारखेस झाली असेल, त्या तारखेपासून दोन महिन्याची मुदत संपण्यापूर्वी किंवा विक्री कायम केल्याची सूचना खरेदीदारास ज्या तारखेस मिळाली असेल, त्या तारखेपासून पंधरा दिवसांची मुदत संपण्यापुर्वी, यापैकी जी मुदत अगोदरची असेल त्या मुदतीपुर्वी देण्यांची आहे.
४) लिलावामध्ये बोललेली संपूर्ण रक्कम विहीत मुदतीत देण्यांस खरेदीदाराने कसूर केल्यास, अनामत म्हणून ठेवलेल्या रक्कमेतून लिलावाच्या विक्रीच्या प्रक्रियेचा खर्च भागविण्यांत आल्यानंतर शिल्लक अनामत रक्कम शासकीय तिजोरीत जमा करण्यांत येईल व अशा मालमत्तेच्या विक्रीसाठी पुन्हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत येईल. सदरचा जाहिरनामा आज दिनांक ०७/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केला.

क्र.मशा/जमिनबाब/कात–१/वावले/लिलाव/२०२४/४२३
तहसिलदार खालापुर यांचे कार्यालय,
दिनांक :– ०७/०१/२०२५

**सही/–**
**(अभय चव्हाण)**
तहसिलदार खालापूर

### MAHATRANSCO — SRM E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| Tender details | Schedule |
|---|---|
| Tender No. : E-Tender -01/2025-26<br>**Name of Tender :** E-Tender for providing daily sweeping/ cleaning services alongwith cleaning materials at office, godown & yard area of Major Stores, Panvel for the period 01.04.2025 to 31.03.2026.<br>**Tender Fee :- Rs. 500 /- + applicable GST**<br>**RFx No.- 7000034949** | **Online Downloading the RFx :** Dt.18.01.2025, 00:00 Hrs. to 01.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx:** On or Before Dt. 01.02.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx** : Dt. 03.02.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 03.02.2025 at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: -The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note** : All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer, Major Stores, Panvel.**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत मालक **पुजा प्रदीप कदम** रा. शिवालीक हाइट्स, प्लॉट नं. १३०३, फ्लॅट नं. ४३, पोलिस हेड कॉर्टस, नवी मुंबई, यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन :**
**मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड**
सर्व्हे नं. ४१/ए / ४९
बिल्डींगचे नाव– शिकारा अवेन्यु, रूम नं. १०१,
क्षेत्रफळ ६१० स्केअर फूट कारपेट एरिया

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०१/२०२५

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
अॅडव्होकेट

पत्ता :– शॉप नं. १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.
मो. नं. ८१०८५५८२८९

### अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात

पत्ता : पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती इमारत, रायगड बाजार जवळ, मार्केट यार्ड, पनवेल – ४१०२०६.

(Tenancy Mannual, Form VIII)
महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**३२ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/३५/२०२४**

१. श्री. बाळकृष्ण गणपत पाटील
२. श्रीम. सुलोचना केशव पाटील
रा. मु. दिघाटी, ता. पनवेल जि.रायगड — **अर्जदार / कुळ**

**विरुध्द**

श्री. माधव गणपत पाटील,
रा.रावे, ता.पेण, जि.रायगड — **सामनेवाले / जमीनमालक**

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं./ गट नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | दिघाटी | ५५ | २/३/४/अ | ०–१६–१०<br>पो.ख ०–०२–३०<br>**एकूण ०–१८–४०** | १.७२ |

ज्याअर्थी जिल्हा रायगड, तालुका पनवेल, गाव दिघाटी यांतील वर निर्दिष्ट केलेल्या जमिनी....

तुम्ही

अर्जदार यांचे पूर्वज, हे कृषिदिनी कुळ म्हणून करीत असल्याकारणाने, सदर जमिनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ यांच्या ३२ व्या कलमान्वये त्यांनी तुम्ही खरेदी केल्या आहेत असे समजण्यांत येण्याचे योजिले आहे.

ज्या अर्थी आता तुम्हांस नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास तारीख **२१/०१/२०२५** रोजी दुपारी **१२:००** वाजता पनवेल येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे तुम्ही हजर रहाणेस कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काही ही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरुवात करण्यांत येऊन गुणवत्तेवर निकाल दिला जाईल. तसेच सुनावणीचे तारखेनंतर ही नोटीस प्राप्त झालेस आपण ही नोटीस मिळालेनंतर ८ दिवसाचे आत इकडील कार्यालयात उपस्थित राहून सुनावणीची तारीख समक्ष घेऊन जावी. या अनुषंगाने फेरनोटीस काढली जाणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

ठिकाण :– पनवेल.
दिनांक :– १६/०१/२०२५

(कोर्टाचा शिक्का)

**सही/–**
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पनवेल, रायगड

# खोपटे पुलाच्या डागडूजीसाठी पाच कोटी निधी मंजूर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील खोपटे पुलावरील खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्याचवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाने जुन्या खोपटे पुलाच्या मजबुतीकरणासाठी पाच कोटी रुपयांच्या खर्चाचा आराखडा तयार केला असून या पुलाच्या दुरुस्तीला लवकरच सुरुवात करण्यात येणार आहे.



तालुक्यातील पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागांना जोडणाऱ्या खोपटे पुलाच्या दोन्ही मार्गिका खड्डेमय झाले आहेत. पुलावरील या खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. या पुलावरून दररोज शेकडो अवजड वाहने वाहतूक करीत आहेत. उरणच्या दोन विभागांना जोडणाऱ्या महत्वाच्या खोपटे पुलावर ये जा करण्यासाठी दोन मार्गिका आहेत. या पुलावरील डांबरेचे थर उखडल्याने खड्डे झाले आहेत. यात जुन्या पुलावरील स्लॅब मधील सळया मोकळ्या झाल्या आहेत. त्या वाहनांचा टायर अडकून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत मोडणाऱ्या या पुलाची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावर आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष सुरू आहे. अवजड वाहना बरोबरच प्रवासी वाहनेही मोठया प्रमाणात प्रवास करीत आहेत. या प्रवासी वाहनांना ही धोका निर्माण झाला आहे. खोपटे पूल ते कोप्रोली हा मार्ग आधीच नादुरुस्त आहे. याचा फटका येथील प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे खोपटे पूल आणि मार्गाची लवकरात लवकर दुरुस्ती करा अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

खोपटे खाडीपूल हा एक ऐतिहासिक आहे. अनेकवर्षे रखडल्या नंतर उदघाटना विनाच १९९५ ला हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. लोड बेरिंग ने जोडलेल्या या पुलावरून सध्या मोठ्या प्रमाणात जड कंटेनर वाहनांची वाहतूक होत आहे. त्यामुळे तो वारंवार नादुरुस्त होऊ लागला आहे.

जुन्या खोपटे पुलाच्या मजबुतीकरणासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून त्याची खाडीच्या दिशेने तपासणी करण्यात आली आहे. त्यानुसार या पुलाचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पूलावरील वारंवार उडखत असलेल्या धरावर उपाय म्हणून नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून थर टाकण्यात येणार असल्याची माहिती उरणच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त अभियंता नरेश पवार यांनी दिली आहे.

# नवी मुंबईत रस्ते गुणवत्ता वाढ आणि वाहतूकविषयक कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या स्थापत्य कामांमध्ये नवतंत्रज्ञानाचा समावेश करून कामांमध्ये गुणवत्ता वाढ व्हावी व याचा उपयोग नागरिकांना दर्जेदार सुविधापूर्ती करताना व्हावा यादृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात अभियांत्रिकी विभागाच्या वतीने शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या माध्यमातून विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात अधिक चांगल्या दर्जाची रस्तेनिर्मिती तसेच बांधकाम आणि व्यवस्थापन नियोजन या विषयावरील या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत आयआयटीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी स्थापत्य कामांच्या गुणवत्ता वाढीबाबत सविस्तर आणि अद्ययावत माहिती दिली. यामध्ये आयआयटीचे प्रा. धर्मवीर सिंह यांनी बिटुमिनस आणि काँक्रीट रस्त्यांचे बांधकाम व गुणवत्ता, क्षेत्रीय बांधकाम आणि ओव्हरले, व्हाईट-टॉपिंग तसेच प्रगतीपथावरील प्रकल्पांची गुणवत्ता तपासणी पध्दती, रस्त्यांचे क्षेत्रीय मूल्यांकन आणि ओव्हरले, व्हाईट टॉपिंग किंवा बिटुमिनस किंवा इतर कोणत्याही तंत्रांच्या गरजांशी



संबंधित मूल्यांकन आणि पदपथ बांधकामाशी संबंधित प्रकल्पांच्या डिझाइन, प्रस्ताव आणि तांत्रिक बाबींचा आढावा अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण भाष्य करीत उपस्थितांच्या माहिती व ज्ञानात भर टाकली.

आयआयटीचे प्रा.अविजीत माजी यांनी वाहतूक व्यवस्थापन, नियोजन, घटना शोध आणि व्यवस्थापन, रस्ता सुरक्षा ऑडिट, वाहतूक नियंत्रण उपकरणे अशा विविध विषयांच्या अनुषंगाने व्याख्यान देत यामधील बारकावे समजून सांगितले. दोन सत्रात दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्यासह स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, यांत्रिकी विभागांचे कार्यकारी अभियंते व सर्व अभियंते तसेच रस्ते कंत्राटदार, त्यांचे अभियंते उपस्थित होते.

# 'दिबां'नी प्रकल्पग्रस्तांना न्याय दिला -ना. नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनात 'दिबां'ची आणि आमची विचारसरणी वेगळी असली तरी येथील भूमिपुत्रांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी केलेल्या आंदोलनामुळेच खऱ्या अर्थाने न्याय मिळाला, असे गौरवोद्गार राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिबांच्या जयंतीनिमित्त कोपरखैरणे येथे काढले.

दि. बा. पाटील यांची ९९ वी जयंती आणि आगरी कोळी युथ फाउंडेशनच्या १२ व्या वर्धापन दिन सोहळ्यात कोपरखैरणे येथील शेतकरी समाज सभागृहात सोमवारी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी आगरी कोळी मेडिकोजचे अध्यक्ष डॉ. दिनेश म्हात्रे, माजी सहायक आयुक्त सुहास पाटील,

## आगरी कोळी युथ फाउंडेशनच्या वतीने 'दिबां'ना अभिवादन

महसूल विभागाचे माजी सहसचिव ॲड. प्रदीप इंदुलकर, वरिष्ठ वास्तू विशारद शिवाजी पाटील, इंडियन इ. ऑफ. आर्किटेकचे अध्यक्ष कौशल जेडिया, सिडको युनियनचे अध्यक्ष संजय पाटील यांच्यासह आयोजक आगरी कोळी युथ फाउंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील, उपाध्यक्ष रवी मढवी व संस्थेचा पदाधिकारी उपस्थित होते.

सलग ४० वर्षे 'दिबां'च्या विचारांचा आणि संस्थांचा कार्यभार सांभाळणारे त्यांचे सहकारी रघुनाथ ठाकूर यांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला. सीए पदवीप्राप्त भारवी भारत भगत (वाशी गाव), चिन्मय अशोक पाटील (गोठीवली), हीना राजकमल म्हात्रे (कोपरखैरणे), स्वप्नील संजय पाटील, निकिता दिलीप पाटील (तळवली). प्रतीक रवींद्र पाटील, वैद्यकीय क्षेत्रात डॉ. प्रांजल प्रवीण पाटील (घणसोली), डॉ. मोहिनी चंद्रशेखर केणी (दिवा कोळीवाडा), डॉ. संजना अशोक नाईक (दिवा कोळीवाडा), डॉ. मानसी म्हात्रे (नेरूळ) एमबीए आयटी क्षेत्रात विप्लव विजय मढवी (घणसोली), सोनाली दिलीप घरत (नेरूळ) आणि शरयू महेंद्र सुतार (कोपरखैरणे) यांच्यासह एकूण ३० जणांना उत्तुंग कामगिरीनिमित्त सन्मानित करण्यात आले.

# आविष्कार विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

छत्रपती शिक्षण मंडळ संचालित विवेकानंद संकुल सानपाडा येथे संस्था पातळीवरील विभागीय विज्ञान प्रदर्शन झाले.कल्पकतेकडून कृतीकडे या विचारावर आधारित विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कृतीला व त्यांच्या कल्पनेला विज्ञानाची जोड देऊन समस्यांचे निराकरण कसे करायचे हे या उपक्रमातून आपल्याला दिसून आले.



प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर जोशी यांनी केले. प्रदर्शनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अमर दुरगुले परीक्षक म्हणून चिन्मयी वैद्य, मोनिका पराड मुख्याध्यापक विलास वाव्हळ, ऋतुजा गवस, रश्मी विघ्ने, तनुजा नायर उपस्थित होते.


प्रमुख पाहुणे यामुळे दुरगुळे यांनी नैसर्गिक स्तोत्रांचा अमर्याद वापर केल्याने निर्माण झालेल्या समस्या त्यामध्ये पाणी प्रदूषण प्लास्टिकचा भस्मासूर प्रदूषण या समस्या कशा सोडवता येतील याचा विचार भावी पिढीने करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. यासाठी पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अवलंब करावा असे देखील त्यांनी सांगितले. अध्यक्ष नंदकिशोर जोशी यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रदर्शनाचे कौतुक केले. संस्था पातळीवरील विज्ञान प्रदर्शनाची माहिती दिली. सी व्ही रामन, जगदीश चंद्र बोस यांच्या उदाहरणावरून निरीक्षण शक्तीचे जीवनात किती महत्त्व आहे हे पटवून सांगितले. दैनंदिन जीवन जगत असताना आपण विज्ञानाचा जास्तीत जास्त वापर कसा करता येईल याचा विचार करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमांमध्ये एकूण सहा शाळांमधील ३० प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आलेले होते. त्यामध्ये ऊर्जेचा पुनर्वापर सौर ऊर्जेचा वापर कचऱ्याचा पुनर्वापर अपारंपारिक ऊर्जा स्तोत्र अशा विषयांचा समावेश होता. या प्रदर्शनातून सहा प्रकल्पाची केंद्रस्तरावर निवड करण्यात आली. मूडपे यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# अटल सेतूवरून उरण-दादर एनएमएमटी सुरू करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

न्हावा-शिवडी सेतु सागरी महामार्ग हा उरणला जोडणारा असल्याने या महामार्गावरून उरण ते दादर दरम्यान नवी मुंबई महानगरपालिकेची एनएमएमटी



बस सेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. यामुळे उरण मधील नागरिकांना कमी वेळात मुंबई गाठता येऊ शकते. उरण ते दादर दरम्यान अनेकवर्षे एसटी वास सेवा सुरू होती. मात्र या बस संख्येत घट झाली आहे.

त्यामुळे उरण ते दादर किंवा मुंबईतून येथील नागरिकांना बसने प्रवास करणे जिकरीचे बनले आहे. यात एनएमएमटी ने नेरुळ ते उलवे नोड मार्गे मंत्रालय अशी बस सेवा सुरू केली आहे. अशाच प्रकारे उरण ते मुंबई यातील शिवडी दादर पर्यंत जाणारी बस सेवा सुरू करण्यात यावी अशी मागणी ही अटलसेतु सुरू झाल्यानंतर करण्यात आली होती. या मार्गाची चाचपणी ही करण्यात आली होती. मात्र त्याऐवजी नेरूळ ते मंत्रालय अशी सेवा सुरु करण्यात आली आहे.

२००१ पासून उरण ते नवी मुंबई अशी पहिली एनएमएमटी बस सेवा सुरू करण्यात आली, मात्र फेब्रुवारी २०२४ ला ही सेवा काही महिने बंद करण्यात आली होती. त्यानंतर महिनाभरापूर्वी ही सेवा पूर्ववत सुरु झाली आहे. त्यामुळे येथील नागरिकांना दिलासा मिळाला आहे. अटलसेतु वाहतुकीसाठी खुला होऊन सोमवारी एक वर्ष पूर्ण झाले आहे. यादरम्यान उरणला जोडणाऱ्या या न्हावा - शिवडी सागरी महामार्गावरून एनएमएमटी बस सेवा सुरु करण्याची मागणी केली जात आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा शुभारंभ कार्यक्रमात नमुंमपा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतले कार्यालयीन सुलेखनाचे धडे

**नवी मुंबइ: बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे उत्साही आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये मराठी भाषेची समृध्द परंपरा सांगणारे विविध कार्यक्रम आयोजनासोबतच महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रतिभागुणांना वाव देणारे विविध साहित्यिक स्पर्धात्मक उपक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत.

यामध्ये शनिवारी पहिले व्याख्यानपुष्प गुंफताना शासकीय कामकाजात सुयोग्य मराठी भाषेचा वापर या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे सेवानिवृत्त उपसचिव वसंत चौधरी यांचे 'कार्यालयीन टिप्पणी व मराठी सुलेखन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. यामध्ये त्यांनी अत्यंत सोप्या पध्दतीने फाईल अर्थात नस्तीचे स्वरुप, प्रशासनिक लेखन, टिप्पणीलेखन, पत्रलेखन, कार्यालयीन कागदपत्रे मांडणीची सहा गड्डे पध्दती तसेच अभिलेखाचे वर्गीकरण अशा महत्वपूर्ण विषयांवर सविस्तर माहिती दिली.

यामध्ये त्यांनी शासनाकडील पत्रव्यवहाराचे निरनिराळे प्रकार सांगत त्यावरील सुयोग्य कार्यवाहीविषयी विवेचन केले. परिपूर्ण नस्ती कशी असावी हे सांगताना त्यांनी टिप्पणी व पत्रलेखनाच्या तांत्रिक बाजूंविषयी सविस्तर भाष्य केले तसेच पत्राचा मसुदा कसा असावा याविषयीही मार्गदर्शन केले. कार्यालयातील सहा गड्डे मांडणी पध्दतीचे वैशिष्ट्ये विशद करीत त्यांनी कार्यालयातील अभिलेखाचे अ, ब, क, ड स्वरुपात संग्रहणाचे महत्व सांगितले व कागदपत्रांच्या तत्पर उपलब्धतेच्या अनुषंगाने कार्यपध्दतीची गरज सांगितली.

शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या पध्दतीविषयी वसंत चौधरी यांच्यासारख्या शासनातील कायदेविषयक अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वाच्या मार्गदर्शनाचा लाभ मराठी भाषा पंधरवडयाच्या निमित्ताने नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारीवृंदाला होत असल्याचा आनंद व्यक्त करीत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी आजच्या प्रशिक्षणाचा उपयोग महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यालयीन लेखन व कामकाजातील सुधारणांसाठी होईल असा विश्वास व्यक्त केला.

आपल्या दैनंदिन व्यवहारात भाषा ही अत्यंत महत्वाची असून ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे शुध्द स्वरुपात पोहचविण्याची सामाजिक जबाबदारी प्रत्येकाने पार पाडली पाहीजे व त्यासाठी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे असे सांगत आयुक्तांनी केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषेची प्राचीनता सिध्द होऊन तिची महती वाढली असल्याचा आनंद व अभिमान त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी अभिजात मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत मराठी भाषा संवर्धन पंधरवडयात आयोजित विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे तसेच नवी मुंबईतील साहित्यप्रेमी रसिक वाचकांनीही महानगरपालिकेत संपन्न होणा-या या उपक्रमांचा आस्वाद घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.



# दुर्दैवी ठरलेल्या रामदास बोटीचा थरार कादंबरीच्या रूपात

**नवी मुंबई; बातमीदार**

रंगधनु प्रकाशन प्रकाशित चक्रीवादळातील श्री संत रामदास बोट ही ' गज आनन म्हात्रे ' लिखित थरारक कादंबरी ज्येष्ठ साहित्यिका प्रा.प्रतिभा सराफ यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, सेक्टर-१२ येथे प्रकाशन सोहळा साजरा झाला.

याप्रसंगी संत साहित्य अभ्यासक देविदास पोटे, प्रा.अजित मगदुम, प्रा.एल.बी.पाटील, जेष्ठ नागरिक संघ नेरुळ अध्यक्ष अरविंद वाळवेकर, लेखक गज आनन म्हात्रे, नवरंग मंडळ सचिव घनश्याम परकाले हे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मंगळा उदामळे यांनी केले.

गज आनन म्हात्रे ' यांनी सत्याहत्तर वर्षा पूर्वी समुद्री चक्रीवादळात बुडालेल्या रामदास बोटीवर वाचनीय कादंबरी लिहून साहित्य क्षेत्रात मोलाची भर टाकली आहे. या कादंबरीत तत्कालीन लोकजीवन, संस्कृती, भूगोल, ईतिहास सहजतेने आला आहे. या कादंबरीवर सहज चांगला चित्रपट होईल असे प्रतिपादन या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा. प्रतिभा सराफ यांनी केले. प्रा.अजित मगदुम यांनी या थरारक कादंबरीचे इंग्रजी अनुवाद करण्याचे मनोदय व्यक्त केला

**क्लिक...क्लिक...!**



वाराणसी : देशभरातून काशी यात्रेसाठी आलेले भाविक गंगा नदीत बोटीने फिरतात. या वेळी तेथील पक्षी बोटीच्या आसपास आल्यावर भाविक त्यांना खाद्य टाकतात. त्याचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.

# नरेंद्राचार्य महाराजांच्या उपस्थितीत उपासक व साधक दीक्षा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाच्या अंधश्रध्दा निर्मुलन उपक्रमांतर्गत, जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळा लोअर परळ, मुंबई येथे झाला. या वेळी उपासक दिक्षा २२५ व साधक दिक्षा ११७ भाविकांना देण्यात आल्या. दोन दिवशीय सोहळ्यात रक्तदान महायज्ञ शिबिरात ५०० रक्त संकलीत करुन शासनाला सुर्पूद करण्यात आले. सुमारे २० हजार भाविकांनी प.पू. जगद्गुरुश्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला.



अध्यात्मिक सोहळ्यासह जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानाचा मरणोत्तर देहदान हा उपक्रम जनमानसामध्ये अत्यंत प्रभावी पणे यशस्वी होत आहे. सप्टेंबर २०१६ ते जानेवारी २०२५ या कालावधीत ७८ मरणोत्तर देह तसेच ७ वे अवयव दान समाजाच्या सेवेसाठी शासकीय मेडिकल कॉलेजना सुर्पूद करण्यात आले आहेत. ब्लड इन नीड उपक्रमाच्या माध्यमातून ज्या रुग्णांना रक्ताची गरज भासते त्या त्या ठिकाणी हॉस्पिटल येथे जाऊन, आजपर्यंत, २०,००० रुग्णांना रक्त देऊन त्यांचे प्राण वाचविले. तसेच संस्थानच्या माध्यमातून ५३ रुग्णवाहिका २४ तास कार्यरत आहेत. आतापर्यंत २५,००० हून अधिक जखमींचे प्राण वाचविण्यात यश आले आहे.

श्रीक्षेत्र मोफत अन्नदान सेवा, मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा उपक्रम, कृषी साठी अत्यावश्यक उपक्रम तसेच आर्थिक मदत आदि उपक्रम संस्थानांमार्फत राबविले जातात.प.पू. जगद्गुरुश्रींच्या दर्शनासाठी राज्याचे मंत्री, मंगल प्रसाद लोढा, समीर वानखेडे, नाकोटिक्स कंट्रोल ब्युरोचे विभागीय संचालक, चेन्नई) दीपक आकडे (उपजिल्हा अधिकारी, सिडको) , खासदार अरविंद सावंत, आमदार सर्वश्री अमित साटम , दिलीप लांडे , मनोज जामसुतकर माजी खासदार राहुल शेवाळे, माजी आमदार सर्वश्री सुनील शिंदे , यामिनी जाधव , राजन साळवी , भाजपा प्रवक्ता मोहित कंबोज यानी दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# आगरकोट किल्ल्यात नूतन फलक

## नियमावली मात्र फाट्यावर; परिसरात नियमबाह्य बांधकामे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पुरातत्व खात्याच्या सर्वेक्षण विभागाच्या वतीने रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात नियमावलीचे जुने व कालबाह्य फलक काढून टाकून नूतन फलक ठिकठिकाणी लावण्यात आले आहेत, मात्र पुरातत्व खात्याची नियमावली फक्त फलकांवरच असून परिसरात नियमबाहय बांधकामे बिनधोकपणे केली गेली आहेत. याबद्दल इतिहासप्रेमी मंडळी व ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत आहेत.




प्राचीन स्मारक १९५८च्या २४व्या प्राचीन स्मारके आणि पुरातन स्थळे व अवशेष अधिनियमान्वये राष्ट्रीय महत्वाचे म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे. जर कोणी व्यक्ती या स्मारकाची नासधूस, स्थलांतर, हानी, स्वरूप बदल, खराबी, दुरूपयोग करेल अथवा धोक्यात आणेल ती व्यक्तीस दोन वर्ष कारावास किंवा एक लाख रुपये दंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील तसेच नियम ३२ अन्वये प्राचीन स्मारके, पुरातत्वीय स्थळे आणि अवशेष अधिनियम १९५८ अन्वये संरक्षित स्मारकांच्या सीमेपासून १०० मीटर पर्यंत आणि त्या पलिकडे २०० मीटरपर्यंत खणणे, बांधकाम करणे, यासाठी प्रतिबध्द आणि निर्बंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे, असे या फलकांवर नमूद केले आहे.

आगरकोट किल्ला परिसरात मात्र मोठया प्रमाणात बेसुमार नियमबाहय बांधकामे झाली आहेत व सुरू आहेत. शिवाय अनेक ठिकाणी अवशेष, पुरातन वास्तू यांची मोडतोड करून नव्याने बांधकामे केली आहेत व सुरू आहेत. याबाबत अनेकदा स्थानिक ग्रामस्थांनी पुरातत्व खात्याकडे निवेदन दिले आहेत. पुरातत्व खाते ग्रामस्थांच्या निवेदनाने फक्त नोटीस काढण्याचे काम करते, नियमबाहय कामे मात्र थांबविली जात नाही. अथवा कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही.

पुरातत्व खात्याच्या सर्वेक्षण विभागाने जीर्णावस्थेतील जुने फलक हटवून नव्याने नियमावलीचे फलक नव्याने ठिकठिकाणी लावले आहेत, मात्र या फलकांवरील नियमावली येथे भेटी देणार इतिहासप्रेमी मंडळी व ग्रामस्थ यांना वाचण्यासाठी आहेत असेच म्हटले जाते. या फलकांवरील नियमावलीस फाटयावर मारून किल्ला परिसरात नियमबाहय बांधकामे पुर्ण केली गेली आहेत व अदयाप बांधकामे सुरू आहेत. पुरातत्व विभागाच्या या फलकांचा उपयोग काय? ते कशाकरीता लावता? असा सवाल ग्रामस्थ व इतिहासप्रेमी मंडळी करत आहेत.

दरम्यान, याबाबत पुरातत्व विभागाचे अधिकारी ए.एस.आय. बजरंग ऐलिकर यांच्याशी संपर्क केला असता, कोणीही आगरकोट किल्ला परिसरात नियमबाहय बांधकामे केल्याचे आढळल्यास दोन वर्ष कारावास अथवा एक लाख रुपये दंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील, हे कडक धोरण निश्चितपणे राबविले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# माथेरानचे पेव्हर ब्लॉकचे रस्ते दिव्यांगांसाठी वरदान

**माथेरान : प्रतिनिधी**

धूळविरहित रस्त्यांचे स्वप्न साकार होत असताना माथेरानकरांना माथेरान नियंत्रण समितीने निर्देशित केलेल्या क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांमुळे दिलासा मिळाला आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना दिव्यांग पर्यटन जेष्ठ नागरिक किंवा आजारी पर्यटकांनाही प्रवास करणे सोयीस्कर झाल्या असून व्हीलचेअर घेऊन येणाऱ्या पर्यटकांना हा रस्ता म्हणजे सुवर्णसंधीच आहे.



माथेरानमध्ये वर्षानुवर्षे दगड मातीपासून रस्ते बनविले जायचे व या रस्त्यांवरून प्रवास करताना अनेक पर्यटकांची दमछाक होत असे तर येथून वाहतूक करणारे हातरिक्षा चालक तसेच मालवाहू गाडी चालक यांचीही परीक्षा घेणारा तो काळ होता.माथेरान मधील व्यवसायिक व स्थानिक नागरिकांनी अनेक वर्षापासून धूळ विरहित रस्ते माथेरानला असावे असा सूर लावून धरला होता याचा विचार शासन दरबारी करावा लागला व माथेरान सनियंत्रण समितीने सुचवलेले क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते प्राथमिक स्वरूपात केले गेले व हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर एमएमआरडीए च्या माध्यमातून माथेरान मधील बहुतेक मुख्य रस्ते हे या ब्लॉक मार्फत तयार केले गेले, परंतु सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या मार्गावरून प्रवास करताना पर्यटकांनाही सोयीस्कर ठरू लागले होते व आता या रस्त्यांवरून दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेअर वरून प्रवास करणे शक्य झाले आहे तसेच ई-रिक्षाचा पायलेट प्रोजेक्ट माथेरानमध्ये पूर्ण झाला असून या रस्त्यांवरून या रिक्षा अगदी सुरक्षितपणे चालत आहेत. त्यामुळेहे क्ले-पेव्हर ब्लॉक रस्ते दिव्यांग,अपंग प्रवाशांकरता वरदान ठरत आहेत.

सध्यस्थितीत काही ठिकाणी क्ले-पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांना खड्डे पडले असून आता पर्यटक संख्या कमी असल्याने या रस्त्यांची दुरुस्ती पालिकेने तत्काळ करून घ्यावी, अशी मागणीदेखील येथील नागरिक आणि व्यावसायिक करीत आहेत.

# मोरे महिला महाविद्यालयात प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ चंद्रशेखर धुंडीराज देशपांडे यांचा जन्मदिन १४ जानेवारी हा राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त एम.बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या भूगोल विभागाने अंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली.

ही स्पर्धा कनिष्ठ आणि पदवी स्तरावर घेण्यात आली. रोहा तालुक्यातील महाविद्यालयांमधून दोन्ही स्तरांमध्ये एकूण ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत कनिष्ठ स्तरातून प्रथम क्रमांक पार्थ अजय कापसे (द.ग.तटकरे कॉलेज)आणि द्वितीय मिताली मंगेश बारस्कर (एम.बी.मोरे कॉलेज) तसेच पदवी स्तरातून प्रथम क्रमांक वैष्णवी प्रमोद जाधव (एम.बी.मोरे कॉलेज) आणि द्वितीय क्रमांक समीक्षा अरुण वारंगे (डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी कॉलेज) या स्पर्धकांना जाहीर करण्यात आला.



संस्थेचे अध्यक्ष विजय मोरे आणि संचालक अशोक मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन विजेत्यांना गौरविण्यात आले. स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा. दर्शना शिंदे, सहकारी प्रा. प्रज्ञा शिर्के आणि प्राचार्य श्री. प्रसन्न म्हसळकर यांनी केले.

# 'आरटीई २५ टक्के शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा'

**चौक : प्रतिनिधी**

सन २०२५-२६ अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांकरिता आरटीई २५ टक्के शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून खालापूर तालूक्यातील सर्व पात्र पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी तातडीने अर्ज भरावे, असे आवाहन खालापूर गटशिक्षणाधिकारी कैलास चोरमळे यांनी केले आहे.

शैक्षणिक आर.टी.ई.नुसार सन २०२५-२६ या वर्षाकरीता २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. सर्व पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करण्यासाठी https:// student .Maharashtra. gov.in/adm- portal या संकेत स्थळावर जाऊन अर्ज दाखल करावेत. सन २०२५-२६ या वर्षासाठी बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ ( सी)(१) नुसार दुर्बल व वंचित घटकांकरीता शाळांमध्ये बालकांना आरटीईनुसार २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरू झाली आहे. प्रवेश प्रक्रिया अंतर्गत पात्र शाळांची नोंदणी पुर्ण झाली आहे. बालकांच्या पालकांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया दिनांक १४/०१/२०२५ ते २७/०१/२०२५ या काळावधीत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



इच्छूकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण करून कागदपत्राची पुर्तता करून आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा. प्रवेश प्रक्रियेसाठी लागणारी प्रमुख कागदपत्रे जन्माचा दाखला, वास्तव्याचा पुरावा,जात प्रमाणपत्र किंवा उत्पन्नाचा दाखला किमान एक लाख रुपये (१ लाख रू) पालकांनी https:// student .Maharashtra.gov. in/adm- portal या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया विहीत मुदतीत पुर्ण करावी, त्याचं प्रमाणे काही अडचण असेल तर कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन गट शिक्षण अधिकारी चोरामले यांनी केले आहे.

# 'सहकार क्षेत्राला नव्याने झळाळी देण्यासाठी प्रयत्नशील'

**मुरूड : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात सकारात्मक सुसंस्कृत प्रवाह आणण्यासाठी तसेच नवी झळाळी देण्यासाठी सहकार भारती सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन सहकार भारती रायगड जिल्हा अध्यक्ष मेघराज जाधव यांनी केले. मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात सहकार दिनानिमित्य आयोजित कार्यक्रमात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

कार्यक्रमास वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जे.के. कांबळे, मानद सचिव ॲड इस्माईल घोले, माजी प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. मुनेश्वर, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. सुभाष म्हात्रे ,राष्ट्रीयसेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बहिरगुंडे आदी उपस्थित होते.

आपल्या भाषणात जाधव यांनी सहकार तत्वे, सहकार भारती ची कार्यप्रणाली व संघटनात्मक कार्याची माहिती देत सध्याच्या स्थितीत २८ राज्यांमधे ६०० जिल्ह्यांमध्ये बँका, पतसंस्था, सहकारी संस्था, प्राथमिक शेती संस्था, बचतगट, माहिती तंत्रज्ञान, मत्स्य, साखर उद्योग, गृहनिर्माण आदी विविध प्रकोष्ठांमध्ये काम सुरू असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात डॉ. कांबळे यांनी सहकार भारतीचे कार्य अत्यंत समर्पित भावनेने सुरु असून सहकार क्षेत्राला दिशा दिग्दर्शन देण्याचे कार्य अविरतपणे गेल्या ४२ वर्षांपासून चालू असल्याबद्दल अभिनंदन केले.

जय श्रीराम नागरी पतसंस्थेचे सरव्यवस्थापक संजय ठाकूर यांनीदेखील मार्गदर्शन केले. डॉ. मुनेश्वर यांनी सर्वांचे आभार मानले.

# रोह्यात उद्या आरोग्य महाशिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रोहा, रोहा नगर परिषद व सूरज हॉस्पिटल सानपाडा नवी मुंबई यांच्या विद्यमाने रविवारी दि.१९ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह दमखाडी, रोहा येथे स.१० ते दु.२ दरम्यान मोफत महाआरोग्य शिबिर होत असून, शिबिरात रुग्णांवर मोफत उपचार व औषध वाटप करण्यात येणार आहे.

या शिबिरात मेंदूचे आजार, मणक्याचे आजार, मनोविकार, हृदयविकार, ओर्थोपेडीक आदी विकारांवर डॉ. आर. एन. पाटील मेंदू व मणका विकार तज्ञ, डॉ.उदय पाटील हृदय विकार तज्ञ, डॉ.रमा पाटील मेंदू विकार तज्ञ, डॉ.अंजली पाटील मानसोपचार तज्ञ आदी तज्ञांकडून मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. तसेच यावेळी शुगर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी, इ.सी. जी. यांसह तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन रुग्णांना मिळणार आहे. तसेच रूग्णांचे छातीचे एक्स रे काढले जातील व कमी ऐकू येणा-यांसाठी ओडिओमॅट्री तपासणी करण्यात येणार आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत हृदयविकार, डायलेसिस, इंटरव्हेशनल रेडिओलॉजी यांचेही मोफत उपचार करण्यात आले असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ रोहाचे अध्यक्ष किरण ताठरे यांनी दिली. या महाआरोग्य शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

# प्रदीप पाटील यांना पुरस्कार



**चौक :** प्रदिप सखाराम पाटील यांना शिवछत्रपती संघटना राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार कोकण विभाग २०२५ प्राप्त झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे, कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

उत्कर्ष ग्रामस्थ मंडळाचे, शिरवणे विद्यालय आणि जुनियर कॉलेज नेरूळ नवी मुंबई येथील ज्येष्ठ शिक्षक प्रदीप सखाराम पाटील यांच शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांना यापूर्वी अनेक आदर्श व गुणवंत पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यांच्या या भरीव कार्याची दखल घेऊन त्यांना यावर्षीचा कोकण विभाग २०२५ राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार वन मंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत आणि कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते सन्मानित करून मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# महिला सक्षमीकरणासाठी कोकणी तानाबाना युनिटचा पुढाकार

**माणगाव : प्रतिनिधी**

उंच माझा झोका... कोकणी तानाबाना युनिट सेंटरने महिलांच्या सशक्तीकरण व सक्षमीकरणावर भर देऊन महिलांच्या हाताला काम मिळावे हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन महिलांच्या सक्षमीकरणासाठी माणगाव तालुक्यातील दहिवली येथील टी. एस.भोस्तेकर माध्यमिक प्रशाळेत २१ जानेवारी रोजी दुपारी २ ते सायंकाळी ७ या वेळेत महिलांच्या शिवण कामाला सुरवात होणार आहे. तरी या संधीचा लाभ माणगाव व मोर्बा विभागातील महिलांनी व तरुणींनी घ्यावा, असे आव्हान आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



शहरी भागातील महिलांना व तरुणींना काम करण्यासाठी वेगवेगळ्या संधी उपलब्ध असतात. मात्र ग्रामीण भागातील महिलांना अशा संधी क्वचितच असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील या महिलांना,तरुणींना छोटे-मोठे काम करण्यासाठी किंवा नोकरीसाठी शहराकडे धाव घ्यावी लागते. या ग्रामीण भागातील महिलांना कोकणी तानाबाना सेंटरने एक आशेची किरण दाखवून ग्रामीण भागातील महिलांच्या हातांना काम देण्याचा प्रयत्न केला आहे. संसाराच्या फाद्यांना बांधलेला महिलांचा झोका ज्यावेळेस सृजनात्मक काम सुरु केल्यानी स्वप्नांना घेऊन उंच माझा झोका प्रमाणे गरुड भरारी घेऊन ती आनंदीत होऊन आपल्या जवळच्या सहकाऱ्यांना महिला सक्षमी करणाबाबत माहिती देते. असाच एक उपक्रम माणगाव तालुक्यातील दहिवली,ढाकशेळी,देगावच्या १५ महिलांनी एकत्र येऊन सुरु केला आहे. श्री. टी.एस.भोस्तेकर शाळेच्या आवारात दिमाखात महिलांनी कापडी पिशव्या शिवून कामाचा शुभारंभ केला आहे. परदेशातील एक ऑर्डर व पुण्यातून लगेच दुसरी ऑर्डर पूर्ण करून ग्रामीण भागातील या महिलांचा आनंद,उत्साह द्विगुणित झाला आहे. माणगाव,मोर्बामधील लेडीज टेलर,व्यापारी,प्रतिष्ठित महिला प्रतिनिधी व नव्याने शिवणकामात जोडू इच्छिणारी महिलांनी,तरुणींनी दि.२१ जानेवारीला वरील वेळेत उपस्थित राहून कोकणी तानाबाना सेंटरला भेट द्यावी. या सेंटरला जोडून कामाला हातभार लावणाऱ्या महिलांना खास भेट वस्तू व पुढील शिवण कामाच्या प्रशिक्षणात विशेष सूट दिली जाणार आहे. महिलांच्या नवीन सुरु झालेल्या या युनिटला माणगाव परिसरातील महिलांनी,तरुणींनी,प्रतिष्ठित महिलांनी भेट देऊन सामील होऊन महिला सक्षमीकरणाच्या या उपक्रमाला सहकार्य करावे असे आवाहन कोकणी तानाबाना सेंटरतर्फे करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१)२२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र. ३८ सन २०२४-२०२५** (दुबार निविदा / तृतिय निविदा)

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. (तृतिय निविदा) | ३६,९७,११९/- |
| २ | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जि. रायगड येथील रस्त्यावरील दुतर्फा वृक्ष लागवड व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणे. (तृतिय निविदा) | १५,५७,१५०/- |
| ३ | सा.बां. विभाग अलिबाग अंतर्गत उपविभाग सुधागड पाली जि. रायगड येथील कार्यक्षेत्रातील इमारतीच्या परिसरात वृक्ष लागवड करणे व ३ वर्षासाठी देखभाल व दुरुस्तीसह. (तृतिय निविदा) | ५,११,६३५/- |
| ४ | चौल वावे बेलोशी रस्ता प्रजिमा ३० मध्ये कि.मी. ०.०० ते ७/८०० मध्ये संरक्षक ति बांधणे. ता. अलिबाग, जि. रायगड. (दुबार निविदा) | ८२,२९,४६१.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :** (अ.क्र.१ ते ३) दिनांक २०.०१.२०२५ (स.१०.००) ते दिनांक २७.०१.२०२५ (सं.१८.००)
(अ.क्र.४) दिनांक २०.०१.२०२५ (स.१०.००) ते दिनांक ३.०२.२०२५ (सं.१८.००)

**ई-निविदा उघडणे :** (अ.क्र.१ ते ३) दिनांक ३०.०१.२०२५ (दु.३.०० वा.)
(अ.क्र.४) दिनांक ६.०२.२०२५ (दु.३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/१९३/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- १५/०१/२०२५

**सही/-**
**(ज. ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



# विजय हजारे ट्रॉफी : आज कर्नाटक वि. विदर्भ अंतिम लढत

**वडोदरा : वृत्तसंस्था**

विजय हजारे चषक स्पर्धेत शनिवारी (दि. १८) बडोद्याच्या मैदानात कर्नाटक आणि विदर्भ यांच्यात अंतिम लढत होणार आहे. वडोदरा येथील कोटंबी स्टेडियमवर विजेतेपदाचा सामना रंगेल.


पहिल्या सेमी फायनल सामन्यात मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील कर्नाटक संघाने हरयाणाला नमवून फायनलमध्ये एन्ट्री केली. कर्नाटककडून देवदत्त पडिक्कलसह ८६ (११३) आणि स्मरन रविचंद्रन ७६ (९४) यांनी संयमी, पण महत्त्वपूर्ण खेळी केली.

दुसऱ्या सामन्यात विदर्भ संघाने महाराष्ट्राला मात दिली. करुण नायरने महाराष्ट्राविरुद्ध ४४ चेंडूत ८८ धावांची नाबाद खेळी केली. जितेश शर्मानेदेखील झटपट अर्धशतक झळकावत करूणला साथ दिली.

बीसीसीआय अंतर्गत रंगणाऱ्या देशांतर्गत वनडे स्पर्धेत कर्नाटकचा संघ पाचव्यांदा फायनलमध्ये पोहचला आहे. याआधी चार वेळा खेळलेल्या फायनलमध्ये त्यांनी बाजी मारली आहे. याचा अर्थ हा संघ फायनलमध्ये पोहचला की ट्रॉफीवर नाव कोरल्याशिवाय मागे फिरत नाही, असा खास रेकॉर्ड कर्नाटकच्या नावे आहे. पुन्हा ते जेतेपदाचा डाव साधणार का? ते पाहण्याजोगे असेल.

दुसरीकडे विदर्भाने प्रथमच विजय हजारे चषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. ते बलाढ्य कर्नाटकला मात देणार का हे पाहणे रंजक असेल.

# रणजी ट्रॉफीपूर्वी विराट दुखापतग्रस्त



## अनेक खेळाडू देशांतर्गत खेळणार

भारतीय कर्णधार रोहित शर्माने मुंबईच्या रणजी संघासोबत सरावालाही सुरुवात केली आहे, मात्र तो मुंबईकडून खेळेल की नाही याबाबत स्पष्टता नाही. रिपोर्ट्सनुसार यष्टीरक्षक फलंदाज रिषभ पंत दिल्ली संघाचे नेतृत्व करणार आहे. याशिवाय यशस्वी जयस्वाल आणि शुबमन गिलदेखील रणजी ट्रॉफीमध्ये खेळताना दिसू शकतात.

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार खेळाडू विराट कोहली बऱ्याच वर्षांनंतर रणजी ट्रॉफीमध्ये खेळणार असल्याची बातमी आली होती. तो सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात दिल्ली संघाचा भाग असू शकतो, असे बोलले जात होते, मात्र विराटची मान मुरगळली आहे. त्यामुळे त्याचे सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात खेळणे कठीण झाले आहे.

वृत्तानुसार विराट कोहलीच्या मानेला दुखापत आहे. यावर त्याने इंजेक्शनही घेतल्याचे बोलले जातेय. तो रणजी ट्रॉफीमध्ये दिल्लीच्या उर्वरित दोन सामन्यांपैकी पहिल्या सामन्यात खेळू शकणार नाही. दिल्ली क्रिकेट असोसिएशनचे निवडकर्ते यावर जेव्हा काही अपडेट देतील तेव्हाच गोष्टी स्पष्ट होतील. सूत्रांनुसार विराट निश्चितच दिल्ली संघात सहभागी होईल आणि उपलब्ध असल्यास तो खेळूही शकतो. तो २१ आणि २२ जानेवारी रोजी दिल्ली संघासोबत सराव करणार आहे.

विराटने रणजी ट्रॉफीमध्ये शेवटचा सामना २०१२मध्ये खेळला होता. तेव्हापासून तो त्याच्या स्थानिक संघासाठी प्रथम श्रेणी क्रिकेट खेळलेला नाही. अलिकडच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात कोहलीसह सर्व भारतीय फलंदाजांची कामगिरी खूपच खराब होती. यामुळे सर्वांना देशांतर्गत क्रिकेट खेळण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतर आता विराट आणि रोहित शर्मा सारखे खेळाडू रणजी ट्रॉफी खेळताना दिसू शकतात.

## संजू सॅमसन चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर?

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे, मात्र एकदिवसीय मालिकेसाठी अद्याप संघ जाहीर झालेला नाही. बीसीसीआय लवकरच एकदिवसीय मालिकेसाठी बैठक घेऊ शकते. परंतु त्यापूर्वी भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसनसाठी वाईट बातमी समोर येत आहे.



आतापर्यंत संजू सॅमसनकडे चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी विकेटकीपर म्हणून पाहिले जात होते, पण आता त्याच्या अडचणी वाढू शकतात. इंग्लंड मालिकेव्यतिरिक्त त्याला चॅम्पियन्स ट्रॉफीमधूनही वगळले जाऊ शकते. संजूने सध्या जारी विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत भाग घेतलेला नाही. त्याच्या या निर्णयावर बीसीसीआय खूप नाराज आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार बीसीसीआय या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणार आहे. बोर्डाला आता टीम इंडियाच्या खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेटला महत्त्व द्यावे असे वाटते. रिपोर्ट्समध्ये दावा केला जात आहे की, संजू सॅमसनने केरळ क्रिकेट असोसिएशनला सांगितले होते की, तो विजय हजारे ट्रॉफीच्या तयारीसाठी कॅम्पमध्ये येऊ शकणार नाही. यानंतर केसीएने त्याला स्पर्धेतून वगळले, ज्यामुळे वाद वाढला.




# राष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत सह्याद्री असोसिएशनचे सुयश

**धाटाव : प्रतिनिधी**

छत्तीसगडमधील रायपूर येथे राष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन रायपूर मिक्स बॉक्सिंग असोसिएशनने केले होते. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील सह्याद्री मार्शल आर्टस् असोसिएशनच्या स्पर्धकांनी सुयश संपादन केले.

यामध्ये आदित्य महेंद्र लोखंडे, अनुज महेश करंजे, वेद प्रवीण करंजे, योग संजय करंजे, अनिरूद्ध महेश ओक, लावण्या मेघेश मोरे व ऋग्वेद राहुल शेडगे यांनी सुवर्णपदक पटकावले. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

या यशाबद्दल राकेश पाटील, श्रीकांत ठाकूर, रोहित मोरे, वृषाल गोवर्धने, किरण डाखवे, रंजित रेवाळे, कल्पेश पाटील, मंदार मोरे, कृणाल मालुंजकर, रोहन मोरे, मनाली पाटील यांच्यासह सह्याद्री मार्शल आर्ट असोसिएशन सभासदांनी यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले.

### छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धा

# पालघर, पुणे, कोल्हापूर, अहिल्यानगर, ठाणे, सांगली संघांची आगेकूच

**बारामती : प्रतिनिधी**

पालघर, पुणे शहर, कोल्हापूर, अहिल्यानगर, पिंपरी चिंचवड, मुंबई उपनगर यांनी पुरुषांत, तर ठाणे शहर, सांगली, पुणे शहर, पालघर महिलात २३व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेत आपापल्या गटात विजय मिळविले.

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या यजमानपदाखाली बारामती येथे सुरू असलेल्या या कबड्डी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळच्या सत्रात पुरूषांच्या अ गटात पालघर संघाने अमरावती संघावर ५३-३२ असा विजय मिळविला. मध्यंतराला पालघर संघाकडे २७-१४ अशी आघाडी होती. पालघरच्या प्रतिक जाधवने आक्रमक खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. अमरावतीच्या अभिषेक पवार याने चांगल्या खेळाचे प्रदर्शन करीत एकाकी लढत दिली.

ड गटात पुणे शहर संघाने सांगली संघावर ३५-२७ असा विजय मिळविला. मध्यंतराला पुणे शहर १३-१४ असा पिछाडीवर होता, मात्र प्रशिक्षक तुषार नागरगोजे यांनी खेळाडूंना संयम ठेवून खेळण्यास सांगितले व



त्याचा सकारात्मक परिणाम होऊन संघाला विजय मिळविता आला.

ब गटात कोल्हापूर संघाने विदर्भातील तगड्या समजल्या जाणाऱ्या वाशिम संघाला ४२-२३ असे पराभूत केले. मध्यंतराला कोल्हापूर संघाकडे १९-१५ अशी आघाडी होती. कोल्हापूरच्या ओमकार पाटील व साहिल पाटील यांना जोरदार चढाया करीत वाशिम संघाला सावरण्यास संधीच दिली नाही, तर आदित्य पोवार व दादासाहेब पुजारी यांनी सुरेख पकडी केला. वाशिमच्या गजानन कुऱ्हे व आकाश चव्हाण यांनी चांगला खेळ केला.

ब गटात अहिल्यानगर संघाने मुंबई शहर पश्चिम संघावर ४७-२४ असा दणदणीत विजय मिळविला. मध्यंतराला अहमदनगर संघाकडे २५-११ अशी आघाडी होती. अहमदनगरच्या आदित्य शिंदे याने चौफेर आक्रमण करीत संघाला विजय मिळवून दिला, तर सौरभ राऊत याने चांगल्या पकडी केल्या. मुंबई शहर पश्चिम संघाच्या जयेश यादव याने काहीसा प्रतिकार केला.

क गटात पिंपरी चिंचवड संघाने भंडारा संघावर ५५-३२ असा सहज विजय मिळविला. मध्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे ३६-१३ अशी आघाडी होती. पिंपरी चिचवडच्या संकेत लांडगे, हर्षद माने यांनी जोरदार खेळ केला, तर विशाल ताटे याने पकडी घेतल्या.

ड गटात मुंबई उपनगर पूर्व संघाने यवतमाळ संघाचा ४८-३२ असा विजय मिळविला. मध्यंतराला मुंबई उपनगर पूर्व संघाकडे ३०-१५ अशी आघाडी होती. मुंबईच्या आकाश रुदेले व सोहम पुंडे यांनी आक्रमक चढाया केल्या, तर अक्षय बरडे यांनी चांगल्या पकडी केल्या.

महिला विभागात ब गटात ठाणे शहर संघाने अमरावती संघावर ५८-१६ असा एकतर्फी विजय मिळविला. मध्यंतराला ठाणे शहर संघाकडे ३५-८ अशी भक्कम आघाडी होती. ठाणे संघाच्या प्राजक्ता पुजारी व देवयानी पाटील यांनी वेगवान चढाया करीत आपल्या संघाला सहज विजय मिळवून दिला, तर माधुरी गवंडी व जुजा जाधव यांनी उत्कृष्ट पकडी घेतल्या.

ड गटात पुणे शहर संघाने नागपूर ग्रामीण संघावर ६३-१६ असा एकतर्फी विजय मिळविला. मध्यंतराला पुणे शहर संघाकडे ३७-८ अशी निर्णायक आघाडी होती. पुणे शहर संघाच्या आम्रपाली गलांडे हिने आक्रमक खेळ करीत कर्णधाराला साजेसा खेळ केला. दिप्ती शिंदे हिने चांगल्या पकडी करीत विजयात हातभार लावला.

क गटात पालघर संघाने अकोला संघावर ६६-२० असा सहज विजय मिळवित आपली घोडदौड सुरू ठेवली. मध्यंतराला पालघर संघाकडे ३५-१० अशी भक्कम आघाडी होती. पालघरच्या मोक्षा पुजारी, ज्युली मिस्किता यांनी उत्कृष्ट चढाया करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. शाहिन शेख व श्रुती सोमसे यांनी चांगल्या पकडी केल्या.

अ गटात सांगली संघाने नागपूर शहर संघावर ६१-२२ असा विजय मिळविला. मध्यंतराला सांगली संघाकडे २१-११ अशी आघाडी होती. सांगलीच्या कर्णधार श्रध्दा माळी, ऋतुजा अंबी हिने उत्कृष्ट खेळ केला.

पुरुषांच्या ब गटात अहिल्यानगर संघाने कोल्हापूर संघावर ४०-३४ असा विजय मिळविला. मध्यंतराला अहिल्यानगर जिल्हाकडे २४-१९ अशी आघाडी होती. त्यांच्या प्रफुल झावरे व आदित्य शिंदे यांनी सुरेख खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. संघनायक शंकर गदई व सोमनाथ वेडके याने पकडी घेतल्या.

अ गटात पुणे ग्रामीण संघाने पालघर संघावर ४४-३१ असा विजय मिळविला. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २३-१२ अशी आघाडी होती. पुणेच्या स्वप्नील कोळी याने खोलवर चढाया करीत हल्ला चढविला, तर शुभम गायकवाड व सुलतान डांगे यांनी चांगला बचाव करीत पकडी केल्या.

महिला विभागात ठाणे शहर संघाने रत्नागिरीवर २७-१८ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला ठाणे शहर संघ १०-११ असा पिछाडीवर होता. ठाणे शहरच्या माधुरी गवंडी व देवयानी पाटील य़ांनी आक्रमक खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला, तर पुजा जाधवने चांगल्या पकडी घेतल्या.

अ गटात पुणे ग्रामीण संघाने सांगली संघावर ४९-२४ असा विजय मिळविला. मध्यंतराला पुणे संघाकडे २९-६ अशी भक्कम आघाडी होती.

# राष्ट्रपतींच्या हस्ते क्रीडा पुरस्कारांचे वितरण

## मनू भाकर, डी गुकेशसह स्वप्नील कुसाळेही सन्मानित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती भवनात शुक्रवारी (दि. १७) राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार सोहळा पार पडला, ज्यामध्ये क्रीडा जगतातील काही नामवंत खेळाडूंचा गौरव करण्यात आला. या वेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर आणि जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित केले.

मनू भाकरने ऑलिम्पिकमध्ये देशाला नाव लौकिक मिळवून दिला, तर डी गुकेशने नुकतेच बुद्धिबळ स्पर्धेचे जेतेपद पटकावले. याशिवाय भारतीय पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगलाही देशातील सर्वोच्च क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तो भारतीय हॉकी संघाचा भाग होता, ज्याने टोकियो आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकले होते आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्येही संघाचे नेतृत्व केले होते.

याच समारंभात पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता उंच उडीपटू प्रवीण कुमारलाही मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार प्रदान करण्यात



आला. प्रवीण कुमारने टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्य आणि पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले होते, जे त्यांच्या समर्पण आणि मेहनतीचे प्रतीक आहे.

अर्जुन पुरस्कार विजेत्यांमध्ये पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता कुस्तीपटू अमन सेहरावत, नेमबाज स्वप्नील कुसाळे, सरबज्योत सिंग आणि पुरुष हॉकी संघाचे सदस्य सुखजीत सिंग, संजय आणि अभिषेक यांचाही समावेश आहे. दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या नेमबाज स्वप्नीलच्या गुरू आहेत. अशा प्रकारे गुरू-शिष्याचा सन्मान झाला.

# अवघ्या नऊ चेंडूत संपला क्रिकेट सामना

**काठमांडू : वृत्तसंस्था**

क्रिकेटच्या मैदानातून दररोज काही ना काही आश्चर्यकारक घटना समोर येत असतात. सध्या एक क्रिकेट सामना चर्चेत आहे, कारण तो खूपच लवकर संपला. प्रथम एका संघाने पाच षटके फलंदाजी करत दुसऱ्या संघाला विजयासाठी केवळ २१ धावांचे लक्ष्य दिले. लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या संघाने अवघ्या ९ चेंडूत सामना जिंकत पराक्रम केला. दुसऱ्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवरच सामन्याचा निकाल लागला.

नेपाळमधील पंतप्रधान चषक महिला राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा ही टी-२० स्वरूपात खेळवली जात आहे, पण खराब वातावरणामुळे सुदूर पश्चिम प्रांत महिला आणि कर्णाली प्रांत महिला क्रिकेट संघ यांच्यातील सामना प्रत्येकी फक्त पाच षटकांचा खेळला गेला.

सुदूर महिला संघाने सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता आणि हा निर्णय योग्य ठरला. प्रथम गोलंदाजी करताना सुदूरने कर्णालीला केवळ २० धावाच करू दिल्या. कर्णालीने पाच षटकांत सात गडी गमावले आणि फक्त एक चौकार मारला. सातपैकी चार फलंदाज खातेही उघडू शकले नाहीत.

दमदार गोलंदाजीनंतर कविताने फलंदाजी करताना ६ चेंडूत १४ धावा केल्या, तर मनीषा बोहराने ५ धावांचे योगदान दिले. २१ धावांचे लक्ष्य सुदूर संघाने १.३ षटकांत पूर्ण केले.

### कविता-आशिकाची भेदक गोलंदाजी

या सामन्यात सुदूर प. प्रांतच्या कविता कुंवर आणि आशिका महारा या गोलंदाजांनी धुमाकूळ घातला. कविताने दोन षटकांत एक मेडनसह केवळ एक धाव देत दोन गडी बाद केले. आशिकाने दोन षटकांत १२ धावा देत तीन बळी घेतले. रितू कनोजियाला एक विकेट मिळाली.

जीवेत् शरदः शतम्!
सुभाष दिनकर कांबळे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
अमित रोकडे, मयुर मोहिते

जीवेत् शरदः शतम्!
जयरज भोमबले
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
जयद्रथ कोळी

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com